
शनिवार, २३ जुलै २०२२
राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ६
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

पेणमध्ये गतिमंद मुलीवर अत्याचार; आरोपी अटकेत/२
द्रौपदी मुर्मू यांच्या विजयाबद्दल आदिवासी वाडीत लाडूवाटप/५
राष्ट्रीय पुरुष कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राची विजयी सलामी/८

## स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण सोडत नव्याने निघणार




**मुंबई :** राज्यातील ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात सुटल्याने आता निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाची जुनी सोडत रद्द केली असून नव्याने आरक्षण सोडत काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला असून त्यानुसार १३ महापालिकांसाठी आरक्षण सोडत निघणार आहे. राज्यातील मुंबईसह १३ महापालिका, २५ जिल्हा परिषदा आणि २८४ पंचायत समित्यांची निवडणूक जाहीर झाली होती. त्यासाठी आरक्षण सोडतही निघाली, पण दोन दिवसांपूर्वीच ओबीसी आरक्षणाबाबतचा सुप्रीम कोर्टाचा निर्णय आला आहे. त्यामुळे या सर्व निवडणुकांमध्ये ओबीसी आरक्षण लागू होणार असल्याने नव्याने आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. याचा कार्यक्रम जाहीर झाला असून ५ ते ८ ऑगस्टपर्यंत अंतिम आरक्षण सोडत निघणार आहे.

# पनवेलमध्ये आज भाजपची प्रदेश कार्यकारिणी बैठक

### प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह ८०० प्रतिनिधींची लाभणार उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाची प्रदेश कार्यकारिणी बैठक शनिवारी (दि. २३) पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार असून प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार्‍या या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार असल्याची माहिती भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी शुक्रवारी (दि. २२) येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

> प्रदेश कार्यकारिणीची बैठक शनिवारी पनवेलमध्ये होत आहे. अत्यंत कमी वेळातही जबाबदारीने नियोजनबद्ध तयारी या ठिकाणी झाली आहे. त्याबद्दल मी पनवेलकरांचे आभार व्यक्त करतो.
> **–केशव उपाध्ये, मुख्य प्रवक्ते, महाराष्ट्र प्रदेश भाजप**

पनवेल शहरातील मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या पत्रकार परिषदेस कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, युवा नेते विनोद साबळे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष मनोज भुजबळ, कर्जतचे उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, सरचिटणीस दीपक बेहेरे, अमरिश मोकल आदी उपस्थित होते. (पान २ वर..)

## उपराष्ट्रपतीपद निवडणुकीआधीच विरोधकांमध्ये पडली फूट

### मतदान न करण्याचा तृणमूल काँग्रेसचा निर्णय

**कोलकाता : वृत्तसंस्था**

राष्ट्रपतीपद निवडणुकीत भाजपप्रणित एनडीएच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांचा विजय झाला आहे. राष्ट्रपती निवडणुकीनंतर आता उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक होणार आहे. अशात ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत मतदान न करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे निवडणुकीआधीच विरोधी पक्षांमध्ये फूट पडल्याचे चित्र दिसत आहे.

भाजपने पश्चिम बंगालचे राज्यपाल जयदीप धनखड यांना उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार म्हणून घोषित केले आहे, तर विरोधी पक्षांकडून मार्गारेट अल्वा यांना उमेदवारी देण्यात आली आहे. येत्या ६ ऑगस्टला ही निवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत मतदान करणार नसल्याचे जाहीर केले आहे. उमेदवार निवडताना आम्हाला विश्वासात घेतले नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. निवडणुकीअगोदरच विरोधी पक्षांमध्ये फूट पडल्याने अल्वा यांच्या समस्येत वाढ होणार आहे.

दरम्यान, राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत देशभरातील खासदार-आमदारांची मते फुटली. त्यांनी एनडीए पुरस्कृत उमेदवार द्रौपदी मुर्मू यांच्या बाजूने मतदान केले होते. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत तर निवडणुकीआधीच विरोधकांमध्ये फूट पडली आहे.

## सीबीएसई दहावीचा निकाल ९४.९० टक्के, तर बारावीचा ९२.७१ टक्के

**पुणे : प्रतिनिधी**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) वतीने घेण्यात आलेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेचे निकाल जाहीर झाले असून ते अनुक्रमे ९४.९० टक्के आणि ९२.७१ टक्के असे आहेत.

सीबीएसईतर्फे दहावी, बारावीचे निकाल शुक्रवारी (दि. २२) ऑनलाइन घोषित करण्यात आले. देशातील १४ लाख ३५ हजार ३६६ विद्यार्थ्यांनी बारावीची परीक्षा दिली होती. त्यातील १३ लाख ३० हजार ६६२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, तर २० लाख ९३ हजार ९७८ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली होती. त्यातील १९ लाख ७६ हजार ६६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.




## घरोघरी तिरंगी ध्वज फडकवा –पंतप्रधान मोदी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्र सरकारच्या हर घर तिरंगा मोहिमेच्या बळकटीकरणासाठी देशातील प्रत्येक नागरिकाने १३ ते १५ ऑगस्टदरम्यान आपल्या घरावर तिरंगी ध्वज फडकविण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. या मोहिमेमुळे राष्ट्रध्वजाशी आपला संबंध अधिक दृढ होईल, असे म्हणत पंतप्रधान मोदींनी ट्वीट केले आहे.

‘या वर्षी आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना हर घर तिरंगा चळवळीला बळ देऊया. १३ ते १५ ऑगस्टदरम्यान घरोघरी तिरंगा फडकवा. या मोहिमेमुळे राष्ट्रध्वजाशी आपला संबंध अधिक दृढ होईल,’ असे पंतप्रधान मोदींनी म्हटले आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या ७५व्या वर्धापन दिनानिमित्त केंद्र सरकारने हर घर तिरंगा मोहीम आखली आहे. याबाबत ट्विटरवर माहिती देताना गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, या मोहिमेद्वारे देशभरातील सुमारे २० कोटी घरांवर तिरंगा फडकवला जाईल, जो प्रत्येक नागरिकाच्या मनात विशेषतः तरुणांच्या मनात देशभक्तीची अखंड ज्योत अधिक प्रज्वलित करण्याचे काम करेल.

## राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांवर उमटली मराठीची मोहोर



**राहुल देशपांडेंना पार्श्वगायनाचा पुरस्कार जाहीर**

**मुंबई : प्रतिनिधी**

६८व्या राष्ट्रीय पुरस्कारांची घोषणा शुक्रवारी (दि. २२) करण्यात आली. यामध्ये मराठीचा डंका पाहायला मिळाला आहे. सुप्रसिद्ध गायक राहुल देशपांडे यांना ’मी वसंतराव’ चित्रपटासाठी पार्श्वगायनाचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे.

अभिनेत्री सायली संजीव आणि अभिनेता शशांक केतकर याच्या भूमिका असेलल्या ’गोष्ट एका पैठणीची’ चित्रपटाने सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट म्हणून बाजी मारली आहे. अभिनेत्री नेहा पेंडसे हिने निर्मिती केलेल्या ‘जून’ या मराठी सिनेमाला सर्वोत्कृष्ट फिचर चित्रपटाचा पुरस्कार जाहीर झालाय. गोदाकाठ आणि अवांछित या दोन चित्रपटांसाठी अभिनेते किशोर कदम यांना विशेष ज्युरीचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

विशेष उल्लेखनीय फिचर फिल्म विभागात कुंकूमार्चन या मराठी चित्रपटाला बेस्ट फिल्म ऑन फॅमिली व्हॅल्यूचा पुरस्कार जाहीर झालाय, तर सर्वोत्कृष्ट बालकलाकार म्हणून टकटक चित्रपटातील अनिश गोसावीचा सन्मान होणार आहे.



# धमक्यांना कुणीही घाबरत नाही

## शिंदे समर्थक आमदार दीपक केसरकरांचा आदित्य ठाकरे यांना इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

धमक्या कोणाला देत आहात. तुमच्या धमक्यांना कोणीही घाबरत नाही असे प्रत्युत्तर शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकर यांनी शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांना दिले आहे. दरम्यान, आदित्य ठाकरे सध्या महाराष्ट्र दौऱ्यावर असून शिंदे समर्थक आमदारांवर जोरदार टीका करत आहेत. शिंदे समर्थक आमदारांनी पुन्हा निवडून येऊन दाखवावे असे आव्हानही आदित्य ठाकरेंनी दिले आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत केसरकर बोलत होते.

केसरकर पुढे म्हणाले, आदित्य ठाकरे यांचे आव्हान पोकळ आहे. आपल्या भागातील लोकांवर अन्याय होतो तेव्हा तेथील जनता पेटून उठते. नारायण राणे शिवसेनेतून बाहेर पडले तेव्हा कोकणवर अन्याय झाला असे लोकांना वाटले. त्यावेळी श्याम सावंत यांना सोडले तर शिवसेनेचे सर्व उमेदवार पडले होते हा इतिहास आहे. मतदारसंघात पक्षाची मते १०० टक्के असतात. २०, २५ टक्के मते तुमची असतील तिथे राष्ट्रवादीचीदेखील १०-१५ टक्के असतात. उमेदवाराची प्रसिद्धी, काम यावर लोक मतदान करत असतात. पक्षामुळे उमेदवार निवडून येत असतो. तसेच उमेदवारामुळे पक्षाच्या जागा निवडून येतात हेदेखील खरं आहे, असेही केसरकर म्हणाले. आदित्य ठाकरे तरुण आहेत. कसे वागावे, बोलावे यासाठी त्यांनी



वडिलांचे उदाहरण घ्यावे. ते जर इतर नेत्यांसारखं बोलू लागले तर हे प्रकरण अजून चिघळेल. ते माझ्यापेक्षा निम्या वयाचे आहेत. पण ते जेव्हा येतात तेव्हा मी उठून उभा राहतो. कारण तो त्यांच्या आजोबांचा मान आहे. आम्ही बोलत नाही म्हणजे आमच्याकडे मुद्दे नाहीत असे नाही, असा इशारा केसरकरांनी दिला. आम्हा शिवसैनिकांच्या पक्षनिष्ठेवर शंका घेणे आमच्या मनाला लागले आहे. तुम्ही कितीही यात्रा काढा, पण लोकांच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर आम्ही बोलणार, असा इशारा केसरकरांनी यावेळी दिला. शिवसेना बाळासाहेबांची आहे आणि बाळासाहेब एकवचनी होते. एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदाचे वचन दिले गेले होते, ही वस्तुस्थिती आहे. पण ते मिळाले नाही म्हणून त्यांनी बंड केले नाही, ते शांत राहिले. आदित्य ठाकरेंनी एका मुलाखतीत उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदेंना भेटायला बोलावले होते आणि माझे मुख्यमंत्रीपद तुम्हाला देतो सांगितले. त्यावेळी एकनाथ शिंदेंच्या डोळ्यात अश्रू आले होते. यातून त्यांची एकनिष्ठता दिसते. मुख्यमंत्रीपद नको, पण काँग्रेस आणि राष्ट्रवादीला सोडा. ते आपल्याला संपवायला निघाले आहेत. भाजपासोबत युती करा आणि त्याचे मुख्यमंत्री व्हा असे त्यांनी सांगितले हाते. मग त्यांची बदनामी का केली जात आहे? तुम्हाला आघाडी तोडावीशी का वाटली नाही याचे उत्तर द्या, अशी विचारणा केसरकरांनी केली आहे.

### कार्यकर्त्यांना गृहित धरू नका

***मुख्यमंत्री शिंदेंच्या बंगल्यावर रोज हजार लोक असतात, शिवसैनिकांची रांग असते. आमच्या पाठीवर हात फिरवा इतकीच शिवसैनिकांची अपेक्षा होती. मग तो हात गेल्या काही वर्षात का फिरला नाही? त्यामुळे शिवसैनिकांना गृहित धरू नका आणि त्याला आव्हानही देऊ नका. अन्यथा सर्वसाधारण शिवसैनिक पेटून उठेल, असे केसरकर यांनी सांगितले. आदित्य ठाकरे कधी भेटलेच नसल्याने त्यांना खरा शिवैसनिक कोण आणि खोटा कोण हे माहिती नाही. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यालाही ते शिवसैनिक म्हणतील असा टोला केसरकरांनी लगावला. पत्रकार परिषदवेळी दादा भुसे, संजय राठोडदेखील उपस्थित होते.***

आम्ही आमची आमदारकी वाचवू शकलो असतो, आम्ही आमचा वेगळा गट स्थापन करुन दुसऱ्या पक्षात विलीन करु शकलो असतो, पण ते आमच्या रक्तात नाही म्हणूनच याला शिवसेनेचे रक्त म्हणतात. आम्ही बाळासाहेबांचे विचार पुढे घेऊन जात आहोत, म्हणून आमदारकी पणाला लावली. तुमच्यात ही हिंमत असेल तरच स्वत:ला शिवसैनिक म्हणा, असे आव्हान केसरकरांनी दिले. भावनात्मक आव्हान करत लोकांची दिशाभूल केली जात असून हे थांबले पाहिजे. भावना वस्तुस्थितीशी जोडून असल्या पाहिजेत. उद्धव ठाकरे आजारी असताना बंड करण्यात आले हे खोटं आहे. उद्धव ठाकरे बरे झाल्यानंतर एकनाथ शिंदेंसोबत त्यांची भेट झाली. यावेळीच त्यांनी काँग्रेस-राष्ट्रवादीची साथ सोडा सांगितले होते. मी तर गेल्या सव्वा वर्षापासून शिवसेना संपवत असल्याचे सांगत होतो. आम्ही बोललो होतो याचे पुरावेही आहेत, असे केसरकरांनी सांगितले. सगळे कार्येकर्ते निघून जातील असे वाटत असल्यानेच यात्रा काढल्या जात आहेत अशीही टीका त्यांनी केली. आम्ही तुमच्या आदरापोटी शांत आहोत. बाळासाहेबांचे नातू आहात म्हणून तुमच्या रक्तात शिवसेना आहे. पण यांच्या रक्तात बाळासाहेबांनी शिवेसना आणली आहे. त्यामुळे तो अभिमान बाळगत असताना सामान्य शिवसैनिकाचा अपमान करु नका असाही इशारा केसरकर यांनी दिला आहे.

# विरोधी पक्षातील १२६ आमदार, १७ खासदारांनी पक्षादेश झुगारत केले द्रौपदी मुर्मू यांना मतदान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत अपेक्षेपेक्षा काही मते जास्त मुर्मू यांना मिळाल्याचे, विरोधी पक्षातील काही खासदार आणि आमदारांनी मते दिल्याचे स्पष्ट झाले आहे. विरोधी पक्षातील १२६ आमदार आणि १७ खासदारांनी पक्षादेश झुगारत द्रौपदी मुर्मू यांना मतदान केले आहे. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत मतदानाच्या वेळी विरोधी पक्षाकडून विविध दावे केले जात होते, मात्र हे फेल ठरले आहेत.

राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीकडे साऱ्या देशाचे लक्ष लागून राहिले होते. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांचा विजय जरी निश्चित होता, तरी अपेक्षित मतांपेक्षा जास्त मते मिळतात का, विरोधकांची किती मते फुटतात याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. आदिवासी समाजातील महिला उमेदवार देत पाठिंबा ऐरवी न देणाऱ्यांची काही मते आधीच मिळवण्यात भाजपाला यश आले होते. तेव्हा राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत अपेक्षापेक्षा काही मते जास्त मुर्मू यांना मिळाल्याचे, विरोधी पक्षातील काही खासदार आणि आमदारांनी मते दिल्याचे स्पष्ट



झाले आहे. द्रौपदी मुर्मू यांना संसदेत ५४० खासदारांनी तर देशातील २ हजार २८४ आमदारांनी मते दिली. या मतांचे एकूण मुल्य हे ६ लाख ७६ हजार ८०३ एवढं होतं. तर विरोधी पक्षाचे राष्ट्रपती पदाचे उमेदवार यशवंत सिन्हा यांना २०८ खासदारांनी तर देशातील १६६९ आमदारांनी आपले मत दिले. या मतांचे एकूण मुल्य हे ३ लाख ८० हजार १७७ एवढे झाले आहे. एकुण ५३ मते ही बाद झाली होती.

थोडक्यात प्रत्यक्ष मतदान झालेल्या एकूण ४७०१ मतांपैकी दोन हजार ८२४ मते मुर्मू यांना मिळाली, ६४.०३ टक्के एवढी मते मिळाली आणि त्या विजयी झाल्या.

राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत मतदानाच्या वेळी विविध दावे केले जात होते. भाजप खासदारांची संख्या, भाजपशासित राज्ये, बिजू जनता दलासह काही छोट्या पक्षांनी जाहीर केलेला पाठिंबा लक्षात घेता मुर्मू यांना ६० टक्क्यांपेक्षा जास्त मते सहज मिळतील असा अंदाज होता. तर भाजपाच्या काही नेत्यांनी ही टक्केवारी ७० टक्क्यांपर्यंत जाईल असा अंदाजही व्यक्त केला होता. मतमोजणी झाल्यावर जास्त मते निश्चितच मुर्मू यांना मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. या दरम्यान एका वृत्तानुसार गुजरातमध्ये विरोध पक्षांतील १० आमदारांची मते फुटली. आसाममध्ये सर्वाधिक जास्त २२, उत्तर प्रदेशमध्ये १२ आणि गोव्यातील ४ विरोधी पक्षातील आमदारांनी मुर्मू यांच्या पारड्यात मते टाकली. देशभरात विरोधी पक्षाच्या एकूण १२६ आमदारांनी मुर्मू यांना मतदान केले. तर संसदेत अपेक्षा नसतांना विरोधी पक्षातील विविध पक्षांच्या एकूण १७ खासदारांनी मुर्मू यांना मतदान केले.

आंध्र प्रदेश, नागालँड आणि सिक्कीम राज्यातील सर्वच्या सर्व आमदारांची मते मुर्मू यांना मिळाली. केरळमध्ये भाजपचा एकही आमदार नसतांना तेथून एक मत मुर्मू यांना मिळाले. तर तेलंगणासारख्या राज्यात यशवंत सिन्हा यांना सर्वाधिक म्हणजे ११३ मते मिळाली आणि भाजपाला ३ मतांवर समाधान मानावे लागले. बाकी सर्व राज्यात अपेक्षे एवढे मतदान हे मुर्मू यांना झाले आहे.दरम्यान या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागून होते.

## नेरूळ सीवूड्स येथे उद्या रक्तदान शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष, सीवूड्स विभागाच्या विद्यमाने राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त नेरुळ सीवूड्स सेक्टर ४८ ए येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिर हॉलमध्ये महारक्तदान शिबिराचे आयोजन रविवारी (दि. २४) सकाळी ९ ते ३ दरम्यान आयोजित करण्यात आले आहे.

यावेळी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून जीवन देणाऱ्या रक्तदात्यांचा सत्कारही करण्यात येणार असल्याचे भाजपचे माजी नगरसेवक भरत जाधव यांनी या दरम्यान कळविले आहे.

# एकमेकांच्या समन्वयातून कामे करावीत

## पनवेल महापालिकेच्या बैठकीत आयुक्त गणेश देशमुख यांची अधिकाऱ्यांना सूचना

**पनवेल : प्रतिनिधी**

मलनिस्सारण वाहिन्यांची दुरूस्ती, रस्त्यावरील खड्ड्यांची डागडुजी, पावसाळी गटारे, एसटीपी प्लॅन्ट संबधित कामे महापालिका व सिडको व्यवस्थापन यांनी समन्वय साधून काम करावीत अशा सूचना आयुक्त गणेश देशमुख यांनी शुक्रवार (२२ जुलै) झालेल्या बैठकीत अधिकाऱ्यांना दिल्या.



आयुक्त गणेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका अधिकारी आणि सिडको नोडचे कार्यकारी अभियंता यांची संयुक्त बैठक शुक्रवारी महापालिकेत घेण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त सचिन पवार, शहर अभियंता संजय जगताप, कार्यकारी अधिकारी संजय कटेकर, अभियंता सुधीर साळुंखे, प्रितम पाटील खारघर, कळंबोली, कामोठे, पनवेल या चार नोडमधील सिडकोचे कार्यकारी अभियंता, सिडकोचे प्रतिनिधी उपस्थित होते.

चारही नोडमधील मलनिस्सारण वाहिन्यांची दुरूस्ती, पावसाळी गटारे, रस्त्यावर पडलेले खड्डे, एसटीपी प्लॅन्ट यांच्याशी निगडीत विविध विषयांवरती या बैठकीत चर्चा करण्यात आली. कामे तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने सिडको व्यवस्थापन आणि महापालिका अधिकारी यांनी काम करताना एकमेकांमध्ये समन्वय राखणे महत्त्वाचे असल्याचे आयुक्तांनी सांगितले. नागरिकांच्या तक्रारीचे निराकरण करून कामे जलद गतीने करावीत अशा सूचना यावेळी आयुक्तांनी दिल्या.

# गोरख ठाकूर व मित्र परिवारातर्फे वीज कर्मचाऱ्यांचा सत्कार, विद्यार्थ्यांना मदत

**उरण : बातमीदार**

कर्मवीर भाऊराव पाटील शाळा खोपटे येथे या गावातील युवा सामाजिक कार्यकर्ता गोरख ठाकूर आणि मित्र परिवार यांच्यामार्फत शुक्रवार (दि. २२) सकाळी ११.३० वाजता गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक शैक्षणिक मदत करण्यात आली. तसेच वीज कर्मचाऱ्यांचा सत्कारदेखील करण्यात आला.






उरण पूर्व विभागात वीज खूप मोठ्या प्रमाणात खंडित होत असते व त्याचा त्रास पूर्व विभागातील लोकांना होत असतो. परंतु हा त्रास कमी करण्याचे काम हे महावितरणचे कर्मचारी अहोरात्र मेहनत घेऊन वीज पुरवठा लवकरात लवकर पूर्ववत करण्याचे काम करत असतात. अशा मेहनती वीज कर्मचाऱ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. सहाय्यक अभियंता प्रथमेश मयेकर आणि टीमचा शाल, श्रीफळ, भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. आर्थिक मदत करण्यात आलेले विद्यार्थी हे दहावी व बारावीत पहिले दुसरे आलेले आहेत. त्यांना दहावी व बारावीला ७५ ते ९० टक्के मार्क मिळालेले आहेत, परंतु घरची आर्थिक परिस्थिती ही उच्च शिक्षण घेण्यासारखी नसल्या कारणाने त्यांना गोरख ठाकूर व मित्र परिवाराकडून छोट्या प्रमाणात आर्थिक मदत करण्यात आली आहे. तृप्ती चिंतामण पाटील, सुजल रमाकांत म्हात्रे, चैतन्य कैलास घरत आणि सोहम जगजीवन पाटील या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देण्यात आली. या वेळी खोपटे स्कूल कमिटीचे चेअरमन राजन पाटील, वीज वितरणचे सहाय्यक अभियंता प्रथमेश मयेकर, आणि त्यांचे सहकारी, जयेशा ठाकूर (माता पालक संघटना), म्हात्रे, भोईर, कोमल पाटील, भुपेंद्र ठाकूर, खुशाल घरत, विनोद पाटील, तेजस भगत आदी उपस्थित होते.

# पेण कांदळेपाडा येथे गतिमंद मुलीवर अत्याचार; आरोपीला अटक

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील मळेघर ॲरॉसिटी रोड, कांदळेपाडा येथे फिर्यादी यांच्या बहिणीचा गतिमंदपणाचा फायदा घेत आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार करीत फिर्यादी व तिच्या घरातील लोकांना ठार मारण्याची धमकी दिली.

यातील फिर्यादी व त्यांचे पती हे घराचे बाहेर कामावर गेले होते. गुरुवार २३ जून रोजी फिर्यादी यांची पिडीत बहिण ही घरात एकटीच असताना तिच्या गतिमंदपणाचा फायदा घेऊन फिर्यादी यांच्या घराच्या बाजूला राहणारा फिर्यादीचा दिर याने सकाळी १०.३० वाजता फिर्यादीच्या घराच्या खिडकीतून घरात प्रवेश केला. फिर्यादीची गतिमंद बहिण हिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला तसेच वारंवार फिर्यादी व त्यांच्या घरातील लोकांना शिविगाळी करून त्यांना ठार मारण्याची धमकी दिली. याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस मंगळवार, दि. १९ जुलै रोजी रात्रौ १०. ४७च्या सुमारास अटक करण्यात आली आहे. अधिक तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहेत.

# राज्यात आपत्ती प्रतिसाद दलाच्या तुकड्या तैनात

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात अनेक ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू असून पूर परिस्थितीबाबत उपाययोजना म्हणून प्रशासनातर्फे एनडीआरएफ व एसडीआरएफच्या १४ तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

जुलै महिन्यात पावसाने हाहाकार माजविला. या पार्श्वभूमीवर सरकार सतर्क आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयात याबाबत बैठक घेतली. मुख्यमंत्री हे राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांच्या संपर्कात आहेत. विविध सूचना त्यांनी दिल्या आहेत. पूरग्रस्त भागांचे त्वरित पंचनामे करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी मदतही देण्यात आलेली आहे. दरम्यान, राज्यात मध्यम स्वरुपाचा पाऊस सुरु असून प्रशासनाच्या वतीने एनडीआरएफ, एसडीआरएफच्या १४ तुकड्या तैनान ठेवण्यात आल्या आहेत. यात मुंबई (कांजूरमार्ग १, घाटकोपर १) २, पालघर १, रायगड महाड २, ठाणे २, रत्नागिरी-चिपळूण २, कोल्हापूर २, सातारा १, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एनडीआरएफ) एकूण १२ पथक तैनात आहेत. नांदेड १, गडचिरोली १ असे एकूण दोन राज्य आपत्ती प्रतिसाद दल तुकड्या तैनात केलेल्या आहेत. राज्यात १ जूनपासून आजपर्यंत अतिवृष्टीमुळे २८ जिल्हे व २९९ गावे प्रभावित झाली असून ८३ तात्पुरती निवारा केंद्र तयार करण्यात आली आहेत.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
शनिवार, दि. २३ जुलै २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)
कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स
सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर ■ ५. सीकेटी हायस्कूल, न्यू पनवेल
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ७. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल ■ १०. आंबेडकर भवन, पनवेल
- ११. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**


पान १ वरून

# पनवेलमध्ये आज भाजपची प्रदेश कार्यकारिणी बैठक

केशव उपाध्ये यांनी माहिती देताना पुढे सांगितले की, या बैठकीस भाजप प्रदेश प्रभारी व राष्ट्रीय सरचिटणीस सी. टी. रवी, राष्ट्रीय सह संघटनमंत्री शिवप्रकाश, पक्षाचे राष्ट्रीय पदाधिकारी, प्रदेश पदाधिकारी, आमदार, जिल्हाध्यक्ष, विविध मोर्चा-आघाड्यांचे अध्यक्ष आणि कार्यकारिणी सदस्य असे सुमारे ८०० प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. बैठकीचे उद्घाटन प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या संबोधनाने, तर समारोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाने होईल.

बैठकीत माजी प्रदेशाध्यक्ष सुधीर मुनगंटीवार राजकीय प्रस्ताव मांडणार आहेत. ओबीसी राजकीय आरक्षण परत मिळविल्याबद्दल प्रदेश सरचिटणीस चंद्रशेखर बावनकुळे भाजप-शिवसेना सरकारच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडतील. शेतीविषयक प्रस्ताव भाजप किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष वासुदेव काळे मांडतील. दिवसभर चालणाऱ्या या बैठकीत राजकीय सद्यस्थितीविषयी चर्चा होईल तसेच आगामी कार्यक्रम जाहीर करण्यात येईल, अशीही माहिती उपाध्ये यांनी दिली.

पत्रकारांशी संवाद साधताना केशव उपाध्ये यांनी लोकांचा विश्वासघात करणारे सरकार गेले असून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविणारे सरकार राज्यात आल्याची प्रतिक्रिया दिली. गेल्या अडीच वर्षांत ओबीसींचे आरक्षण घालवण्याचे काम महाविकास आघाडीने केले असल्याचे सांगतानाच शिंदे-फडणवीस सरकारने ओबीसींना आरक्षण मिळवून दिल्याचेही अधोरेखित केले तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे या लोकभावनेचा सन्मान शिंदे-फडणवीस सरकारने केल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले. याशिवाय पेट्रोल-डिझेलचे दर कमी करून लोकांना दिलासा दिल्याचेही सांगितले. आताचे सरकार जनतेच्या भावना जाणणारे सरकार आहे. त्यामुळे येत्या काळातही जनतेचे प्रश्न सोडवून त्यांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न हे सरकार करणार असल्याचे उपाध्ये यांनी या वेळी म्हटले.

दरम्यान, भाजप प्रदेश कार्यकारिणी बैठकीची जोरदार तयारी करण्यात आली आहे. पनवेल शहर व परिसरात भाजपचे झेंडे लावण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मुख्य चौकात फलकही लक्ष वेधून घेत आहेत. एकूणच यानिमित्ताने पनवेल भाजपमय झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

# वनवासी बांधवांसाठी फिरता दवाखाना

## पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या हस्ते लोकार्पण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने वनवासी बांधवांसाठी फिरता दवाखान्याचे उद्घाटन महाराष्ट्र भूषण पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी, रायगड भूषण सचिन धर्माधिकारी, राहुल धर्माधिकारी यांच्या हस्ते रेवदंडा येथे झाले.

उरण विधानसभा मतदार क्षेत्राचे आमदार महेश बालदी हे वनवासी बांधवांच्या समस्या सोडविण्यासाठी कायमच पुढाकार घेत असतात. वनवासी समाज हा कायमच मुख्य प्रवाहापासून काहीसा दुरावलेला समाज म्हणून ओळखला जातो. शिक्षणाचा अभाव असल्याने पर्यायाने रोजगार कमी असल्याने आपल्या आरोग्याच्या तक्रारींसाठी हे समाजबांधव दवाखान्यात न जाता त्या तक्रारींकडे दुर्लक्ष करतात. अशा परिस्थितीत या फिरत्या दवाखान्याचा मोठ्या प्रमाणात फायदा वनवासी बांधवांना होणार आहे.





**आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने सुविधा**

*वनवासी बांधवांच्या आरोग्याची हेळसांड होऊ नये यासाठी आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नातून फिरता दवाखाना उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे या वनवासी समाजातील बांधवांना किरकोळ कारणासाठी दवाखान्यात न जाता या फिरत्या दवाखान्याद्वारे उपचार घेता येणार आहेत. आमदार महेश बालदी यांनी हा फिरता दवाखाना उपलब्ध केल्याने वनवासी समाजबांधवांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.*

या फिरत्या दवाखान्याचे लोकार्पण पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी, सचिन धर्माधिकारी, राहुल धर्माधिकारी यांच्या हस्ते रेवदंडा येथे झाले. या कार्यक्रमास आमदार महेश बालदी, जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, खालापूर भाजपचे तालुकाध्यक्ष रामदास ठोंबरे, साई गावचे माजी सरपंच विद्याधर मोकळ, तारा गाचे विद्योगपती बाळुशेठ पाटील, माजी उपसरपंच विद्याधर जोशी, दिघाटीचे सरपंच अमित पाटील, पळस्पे जिल्हा परिषद युवा नेते मंगेश वाकडीकर, आपटाचे माजी सरपंच दत्ता पाटील, तसेच भारतीय जनता पक्षाचे उरण-पनवेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच वनवासी बांधव उपस्थित होते.



**पनवेल : कर्नाळा ग्रुप ग्रामपंचायतीचे सदस्य जूनेद बाळूशेठ दळवी यांनी शुक्रवारी आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. या वेळी केळवणे जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, पळस्पे जि. प. युवा नेते मंगेश वाकडीकर, ताराचे माजी उपसरपंच विद्याधर जोशी, माजी सरपंच राजू पाटील, भय्याशेठ दाखवे, अकल्लाशेठ बडे, प्रफुल्ल पाटील, मोबिंद दळवी, निलेश पाटील, जीवन टकले, केळवणे जि. प. युवा मोर्चा उपाध्यक्ष सुबोध ठाकूर, उद्योगपती बाळूशेठ पाटील, कार्यकर्ते गणेश पाटील उपस्थित होते.**

# पनवेल शहरातील वाहतुकीत आज बदल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपच्या प्रदेश कार्यकारिणीची बैठक शनिवारी (दि. २३) आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित केली आहे. बैठकीसाठी सुमारे ८०० पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते कर्मवीर भाऊराव पाटील चौक मार्गावर स. ६ ते सायं. ६ वा. पर्यंत प्रवेश बंदी आहे. ही वाहतूक कर्मवीर भाऊराव पाटील चौक ते कर्नाळा सर्कल आणि कर्नाळा सर्कल ते छत्रपती शिवाजी महाराज चौक व छत्रपती शिवाजी महाराज चौक ते कर्नाळा सर्कल व कर्नाळा सर्कल ते कर्मवीर भाऊराव पाटील चौकमार्गे वळविण्यात येणार आहे.

# रोटरी क्लब पनवेल इंडस्ट्रीयल टाऊनचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊनच्या अध्यक्षपदाची धुरा काकाजीनी वाडी येथे झालेल्या पदग्रहण समारंभात उद्योजक कल्पेश परमार यांनी स्वीकारली, तर अ‍ॅड. हितेश राजपूत यांनी सचिवपद आणि तुषार तटकरी यांनी खजिनदारपदाचा कार्यभार हाती घेतला. प्रमुख अतिथी आमदार प्रशांत ठाकूर व मंजू फडके यांच्या उपस्थितीत हा समारंभ झाला.

या वेळी अध्यक्ष गुरुदेवसिंग कोहली, सचिव विनोद गुर्मे, खजिनदार मधुसुदन मालपाणी यांनी सूत्रे सोपवली. शुभदा भगत संपादित विश्वचक्र बुलेटिनचे प्रकाशन झाले.

**आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती**

आमदार प्रशांत ठाकूर यांनी, रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊनचा सभासद असल्याचा मला अभिमान आहे. रोटरीचे कार्य उत्तम प्रकारे सुरू आहे. कधी आवश्यकता भासली तर साद द्या, मी मदतीसाठी पुढे असेन, असे आश्वासन दिले.

मंजू फडके यांनी रोटरीच्या कार्याबद्दल माहिती दिली. नूतन कार्यकारिणीत जॉईंट सेक्रेटरी व एन्व्हार्यमेंट चेअरमन अध्यक्ष गुरुदेवसिंग कोहली, चेअरमन फंडरेझिंग डॉ. जयकुमार भंडारकर,



प्रेसिडेंट नॉमिनी व सार्जंट अ‍ॅट आर्मस् चारुदत्त भगत, उपाध्यक्ष व क्लब ट्रेनर पीपी सैफूद्दिन व्होरा, डायरेक्टर क्लब अ‍ॅडमिन जितेंद्र बालड, रोटरी फाउंडेशन डायरेक्टर व ट्रस्टचे चेअरमन अरविंद सावळेकर, मेंबरशिप डायरेक्टर डॉ. प्रमोद गांधी, सर्व्हिस प्रोजेक्ट मेडिकल डायरेक्टर डॉ. जयश्री पाटील, सर्व्हिस प्रोजेक्ट नॉन मेडिकल डायरेक्टर निलेश पोटे, पब्लिक इमेज डायरेक्टर ट्रस्ट सेक्रेटरी प्रमोद वालेकर, न्यू जनरेशन डायरेक्टर अलीअसगर व्होरा, व्होकेशनल डायरेक्टर व लिटरसी चेअरमन विष्णू म्हात्रे, आयटी ऑफिसर चेअरमन ऋग्वेद कांडपिळे, ऑनगोईंग प्रोजेक्ट चेअरमन सुधीर कांडपिळे, बुलेटिन व मॅगेझिन एडिटर शुभदा भगत, सोशल इव्हेंटस् चेअरमन संजय जैन, फेलोशिप चेअरमन राजेंद्र ठाकरे, स्पोर्ट्स चेअरमन सुहास मराठे, मेडिकल प्रोजेक्टस चेअरमन डॉ. सुरेश कारंडे, ग्लोबल ग्रँट व सीएसआर चेअरमन प्रकाश श्रृंगारपुरे, टीआरएफ फाऊंडेशन चेअरमन सुनील अरोरा, मेंबरशिप रिटेंशन चेअरमन किशोर चौधरी, परमनंट इनव्हायटी आमदार प्रशांत ठाकूर आदींचा समावेश आहे. सूत्रसंचालन सृष्टी बालड व मिहीका भगत यांनी केले.

# न्हावा गावात पैशाच्या वादातून हवेत गोळीबार

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

पैशाच्या वादातून मुलाने आई-वडिलांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देत रिव्हॉल्व्हरमधून हवेत गोळीबार करण्याची घटना न्हावा-शेवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. याप्रकरणी आरोपी विक्रांत भोईर पोलिसांनी अटक केली आहे.

न्हावा ग्रामपंचायतीच्या हद्दीत वासंती भोईर (४६), जयवंत भोईर (५२) हे दांपत्य राहात आहे. मुलगा विक्रांत भोईर याच्याशी पटत नसल्याने तो याआधीच शेजारच्या घरात वेगळा संसार थाटून राहात आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे आई-वडिलांशी याआधीच वाद असल्याने नेहमीच विक्रांत भांडण उकरून आई-वडिलांशी वाद करीत होता. जमिनीच्या मोबदल्यात आलेल्या साडेबारा टक्के पैशाच्या वादातून अनेकदा आई-वडिलांना मारहाण करण्यापर्यंत विक्रांतची मजल गेली होती.

आई-वडिलांशी पैशावरून विक्रांतने गुरुवारी (दि. २१) वाद घातला. पैसे मिळत नसल्याने त्याने आई-वडिलांना जीवे मारण्याची धमकीही दिली, मात्र तरीही आई-वडिल दाद देत नसल्याचे पाहून दहशत माजविण्यासाठी रिव्हॉल्व्हरमधून हवेत दोन गोळ्या झाडल्या. याप्रकरणी न्हावाशेवा पोलीस ठाण्यात आई-वडिलांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भटे यांनी दिली.

# पमपा प्रभाग १७मध्ये विजेच्या खांबांची उभारणी

## माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार यांचे प्रयत्न

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मनपाचे माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार यांच्या प्रयत्नाने महापालिका क्षेत्रातील प्रभाग १७ येथील नवनाथ नगर वसाहत, रेल्वेस्टेशन रोड येथे विजेचे खांब बसविण्यात आले आहेत. त्यामुळे नागरिकांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

गेल्या अनेक वर्षांपासून नवनाथ नगर वसाहतीमध्ये रस्त्यावर वीजेचे खंब नसल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांना अंधारात चाचपडत आपली वाट शोधावी लागत होती. याबाबत रहिवाशांनी माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, अ‍ॅड. मनोज भुजबळ, माजी नगरसेविका सुशिला घरत, प्रभाग 'ड'च्या माजी सभापती अ‍ॅड. वृषाली वाघमारे यांना सांगितल्यानंतर त्यांच्या प्रयत्नाने नवनाथ नगर वसाहतीमध्ये रस्त्यावर विजेचे खांब बसविण्यात आले. त्याबद्दल रहिवाशांनी त्यांचे आभार मानले. या वेळी भाजप अनुसूचित जाती मोर्चा तालुका उपाध्यक्ष रावसाहेब खरात, उत्तर रायगड झोपडपट्टी सेल संयोजक राहुल वाहूळकर, अनुसूचित जाती मोर्चा शहर मंडल सदस्य विजय झिरे, महिला कार्यकर्त्या जरीना शेख, सुनील बगडे, राजू झिरे, हिरामण, साळुंखे, तानाजी



शिंदे, आसमा शेख, सोनाली महाडिक, रशिदा शेख, नागम्मा बुटणाळ व रहिवासी उपस्थित होते.

# उसर्ली खुर्द येथे आधार कार्ड शिबिर

## ३५० जणांनी घेतला लाभ

**पनवेल : प्रतिनिधी**

सामाजिक सेविका श्यामला कुलकर्णी आणि संजीवनी महिला ग्रामसंघ उसर्ली खुर्द यांच्यातर्फे गावदेवी मंदिर उसर्ली खुर्द येथे आधार कार्ड शिबिर आयोजित केले होते. शाळा तसेच अंगणवाडीमधील विद्यार्थी आणि गावातील नागरिक अशा ३५० जणांनी याचा लाभ घेतला.

आधार कार्ड हे एक अत्यंत महत्त्वाचे ओळखपत्र आहे. आपण भारतीय नागरिक असल्याचा अद्वितीय पुरावा आहे. या कार्डमुळे आपल्याला विविध सेवांचा लाभ घेता येतो, परंतु दुर्दैव असे की बऱ्याच नागरिकांना अजून त्याचे महत्त्व कळले नाही. याबाबत जनजागृती निर्माण व्हावी यासाठी उसर्ली खुर्द येथे आधार कार्ड शिबिराचा ३५० जणांनी घेतला. या वेळी दीपमाला भगत, संजना मोहिते, संपूर्णा भगत, शिक्षिका चित्ररेखा जाधव, स्नेहल नंदावडेकर, विद्या पवार, सुफला भगत, नंदिनी मोरे, ज्योती कांबळे, समीर भगत यांचे सहकार्य मिळाले.





# मुख्यमंत्री व खासदारांना अपमानित करणाऱ्यांवर कारवाई करा -रामदास शेवाळे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रतिमेस काळे फासून त्यांना अपमानित करून व त्यांना अश्लिल शिवीगाळ केल्यापकरणी आरोपींविरूद्ध कारवाई करण्याबाबत निवेदन एकनाथ शिंदे समर्थक रामदास शेवाळे यांनी कामोठे पोलिसांना दिले आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, आरोपी ललित सोडेवाल, गणेश खांडगे व इतरांनी कामोठे येथे लावण्यात आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रतिमेस काळे फासले. त्यानंतर जमावाने मुख्यमंत्री व खासदारांना अश्लील शिवीगाळ करून बदनामी करण्याचा प्रयत्न केला. संविधानाने स्वत:चा नेता निवडण्याचे अधिकार आम्हाला दिलेले आहे, तरीसुद्धा अनेक समाजकंटक हे आमच्याविरुद्धसुद्धा बदनामीकारक मजकूर समाजमाध्यमांवर प्रसारीत करीत आहेत. त्यामुळे या आरोपींविरूद्ध फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# उरण महाविद्यालयात राष्ट्रध्वज दिन उत्साहात

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शुक्रवारी (दि. २२) राष्ट्रध्वज (तिरंगा) दिन साजरा करण्यात आला.

संविधान सभेने २२ जुलै १९४७ रोजी भारतीय तिरंगा (राष्ट्रध्वज) स्विकारला व राष्ट्रध्वज म्हणून त्यास मान्यता दिली. या निमित्ताने महाविद्यालयात तिरंगा दिनाचे आयोजन केले गेले.



या कार्यक्रमात प्रा. व्हि. एस. इंदूलकर प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. त्यांनी देशाचा जाज्वल्य इतिहास सांगून आपण राष्ट्राभिमानी व देशाभिमानी जीवन जगले पाहिजे, असे सांगितले. प्राचार्य प्रो. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांनी स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगून संविधानिक मूल्य प्रत्येक नागरिकाने आत्मसात केली पाहिजेत, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एनएसएस. कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी तर उपस्थितांचे आभार इतिहास विभागप्रमुख डॉ. एम. जी. लोणे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमात आयक्यूएसी. समन्वयक प्रा. डॉ. ए. आर. चव्हाण, प्रा. ए. के. गायकवाड, प्रा. मेघा रेड्डी, इतर शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



**पनवेल : कलर्स मराठी वाहिनीवरील सूर नवा ध्यास नवा या संगीतमय कार्यक्रमाच्या पाचव्या पर्वाच्या अंतिम १६मध्ये उलवे नोड शिवाजीनगर येथील श्वेता सुरेश ठाकूर हिची निवड झाली आहे. याबद्दल तिला गायक महेश काळेंनी सन्मानित केले. श्वेताचे पं. स. सदस्य तथा महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत यांनी अभिनंदन केले आहे.**

# हनुमान कोळीवाड्यातील २० घरे धोकादायक

**उरण : प्रतिनिधी**

मागील ३३ वर्षांपासून फेरपुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असलेल्या हनुमान कोळीवाडा गावातील आणखी २० घरे अतिवृष्टीमुळे अत्यंत धोकादायक बनली आहेत. जेएनपीए, सिडको, जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ही धोकादायक घरे कोणत्याही क्षणी कोसळून दुर्घटना घडण्याची भीती रहिवाशांकडूनही व्यक्त होत आहे.

जेएनपीए बंदरासाठी विस्थापित करून वसविण्यात आलेले संपूर्ण हनुमान कोळीवाडा गावालाच वाळवीने पोखरले आहे. चिखल आणि वाळवीग्रस्त मातीच्या जागेत भराव करून हनुमान कोळीवाडा गाव उभारण्यात आलेल्या गावातील १०५ कुटुंबासाठी १७ हेक्टर जागा पुर्नवसनासाठी आवश्यक होती. त्यासाठी जेएनपीएने जागा आरक्षितही ठेवली होती, मात्र पुनर्वसन करताना फक्त दोन हेक्टर जागेतच पुनर्वसन



**फेर पुनर्वसनाचा प्रश्न शक्य तितक्या लवकर निकाली काढण्यासाठी जेएनपीए प्रशासनाकडून सर्वोतोपरी प्रयत्न केले जात आहेत. याआधी निर्णय घेण्यासाठी बंदराकडे मर्यादा होत्या. त्यामुळे काही निर्णय केंद्रीय मंत्रालयाच्या मंजुरीनेच घ्यावे लागत होते. त्यामुळे विलंब होत होता. आता मात्र प्राधिकरणाच्या स्थापनेनंतर निर्णय क्षमतेत वाढ झाली आहे. त्यामुळे अखत्यारीतील असलेले निर्णय झटपट घेऊन पुनर्वसनाचा प्रश्न कायमचा निकाली काढण्यात येणार आहे.**
**-जेएनपीए प्रशासन**

करण्यात आले आहे. दोन वर्षांपासून जेएनपीएविरोधात आक्रमक झालेल्या ग्रामस्थांनी भर समुद्रात मालवाहू जहाजे रोखून आंदोलन केले होते. त्यानंतर जेएनपीए, जिल्हा पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई करीत हनुमान



कोळीवाड्याच्या फेर पुनर्वसनासाठी १० हेक्टर जमीन उपलब्ध करून दिली. पायाभूत सुविधांसह विकसित जमिन उपलब्ध करून देण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला आहे. विकासाचा आराखडाही तयार करण्यात आला, मात्र तयार करण्यात आलेल्या आराखड्याला जिल्हा प्रशासन, सिडकोकडून मागील आठ महिन्यांपासून तांत्रिक कारणे पुढे करून मंजुरीसाठी दिरंगाई केली जात आहे. त्यामुळे पुनर्वसनासाठी विलंब होत आहे. त्यामुळे वाळवीग्रस्त हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांना पुनर्वसनाची प्रतीक्षा कायम आहे.

## संपादकीय

# अच्छे दिन येणार

कोरोना काळात वाया गेलेली दोन वर्षे पाहता यंदा तरी सर्वसामान्य रीतीने गणेशोत्सव साजरा करता यावा अशी सर्वांचीच अपेक्षा होती. शिंदे-फडणवीस सरकारने ती पूर्ण केली असे म्हणावे लागेल. दहीहंडी आणि गणेशोत्सव हे दोन्ही गर्दीचे सण आहेत. त्यामुळे निर्बंधमुक्तीचे वरदान मिळाले असले तरी सर्वांनीच सद्सद्विवेकबुद्धी जागी ठेवूनच सामाजिक व्यवहार करायला हवेत. शिंदे-फडणवीस सरकारच्या निर्बंधमुक्तीच्या या निर्णयामुळे महाराष्ट्रातील सांस्कृतिक वातावरण चांगलेच सुधारेल यात शंका वाटत नाही.

**देशभर गाजलेल्या महाराष्ट्रातील सत्तासंघर्षानंतर अखेर येथील नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास टाकला असेल. या नि:श्वासामध्ये एक नाकर्ते सरकार गेले ही भावना आहेच, परंतु त्याचबरोबर लोकभावनेचा आदर करणारे, हवेहवेसे सरकार सत्तेवर आले याचा आनंदही मिसळला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दोघेच सध्या नव्या सरकारचा कारभार पाहात असले तरी येत्या काही दिवसांतच मंत्रिमंडळाचा विस्तार झालेला बघायला मिळेल. अर्थात, हे दोघेही कुठलाही निर्णय घेण्यास समर्थ आहेत याची चुणूक दिसतेच आहे. सत्तेवर आल्या-आल्या महत्त्वाकांक्षी मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कारशेडचा प्रश्न नव्या सरकारने मार्गी लावला. निव्वळ अहंकारापायी मागील सरकारने या प्रकल्पाचे भजे करून ठेवले होते. जनहिताचे अनेक निर्णय गेल्या पंधरा दिवसांत घेतले गेले. आगामी गणेशोत्सव आणि त्याआधी येणारा गोपाळकाल्याचा उत्सव हे दोन्ही सण संपूर्णत: निर्बंधमुक्त असतील अशी घोषणा मुख्यमंत्री शिंदे यांनी गुरुवारी केली, तेव्हा अनेकांना सुखद धक्का बसला. कोरोना काळात लादलेल्या अनेक जाचक नियमांमुळे गणेशोत्सव मनासारखा साजरा करता आला नव्हता. कोरोनाची साथ जोरात होती त्या काळात निर्बंध असणे समजून घेण्याजोगे होते, किंबहुना ते आवश्यकच होते, परंतु नियमांचा बागुलबुवा दाखवून श्रींच्या मूर्तींच्या उंचीवर मर्यादा आणणे, सुरक्षिततेची कारणे पुढे करून भक्तांच्या दर्शनावर निर्बंध लादणे, प्रदूषणाचे निमित्त पुढे करून ध्वनिवर्धकांवर तसेच प्लास्टर ऑफ पॅरिसच्या वापरावर बंदी आणणे असे प्रकार केले गेले. या निर्बंधांना तार्किकदृष्ट्या विरोध करण्याचे कारण नाही, परंतु त्यामुळे गणेशोत्सव मंडळे आणि आयोजकांना काय भोगावे लागले हे सारा महाराष्ट्र जाणतो. गणेशोत्सव कार्यकर्त्यांवर शेकडो गुन्हे नोंदवण्यात आले ही वस्तुस्थिती आहे. गेले काही दिवस राजकीय धुळवडीमुळे राज्यातील वातावरण फार गढूळ झाले होते. मंगलमूर्तींच्या आगमनानंतर महाराष्ट्रातील उरलीसुरली विघ्नेदेखील उरणार नाहीत असा विश्वास वाटतो. शिंदे-फडणवीस सरकारची पडणारी पावले बघितल्यास त्याबद्दल खात्रीच वाटते. येत्या काळामध्ये हे नवे सरकार वेगाने वाटचाल करील आणि वाया गेलेला अडीच वर्षांचा काळ भरून काढेल असे वाटते, किंबहुना ते नव्या सरकारचे कर्तव्यच आहे. याच पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यकारिणीची बैठक शनिवारी पनवेल येथे होत आहे. भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी हे पक्षाचे तरुण नेते या बैठकीच्या आयोजनात विशेष प्रयत्नशील राहिले आहेत. राज्यातील सुखद सत्तांतरानंतर आता राज्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होईल अशी अपेक्षा आहे. मंगलमूर्तींच्या स्वागतासाठी शिंदे-फडणवीस सरकार सज्ज झाले आहे. अवघी सृष्टी श्री गजाननाची उत्सुकतेने वाट पाहात आहे. निर्बंधांचे जोखड फेकून देऊन आपणदेखील या महाउत्सवात सहभागी व्हायला हवे.**


# रायगडातील निसर्गरम्य गावे पर्यटकांचे आकर्षण




रायगड जिल्ह्यात अनेक निसर्गरम्य गावे आहेत. पावसाळ्यात फेसाळणारे धबधबे, अप्रतिम निसर्गसौंदर्य व जैवविविधता अनेकांना भुरळ घालत आहे. जिल्ह्यातील निसर्गसौंदर्य म्हणजे जणू स्वर्गाची अनुभूती देत असते. सध्या येथे असंख्य पर्यटक व निसर्गप्रेमींची अलोट गर्दी होत आहे. फक्त महाराष्ट्रातूनच नव्हे तर भारतातून निसर्गाचा हा अमूल्य ठेवा पाहण्यासाठी व प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी पर्यटक व अभ्यासक येत आहेत. दरम्यान, भिरा, पाटणूस, विळे, ताम्हिणी आदी परिसराला तर निसर्गाचे वरदानच मिळाले आहे.

संपूर्ण परिसरात निसर्गाचा अमूल्य ठेवा दडला आहे. देवकुंड, खजिना ट्रॅक, व्हाईट वॉटर रिव्हर राफ्टिंग या उल्लेखनीय गोष्टींसह गिधाड, बिबटे व राज्य प्राणी शेकरु या दुर्मिळ प्राण्याचे निवास्थानदेखील येथे आहे. हा दुर्मिळ, नैसर्गिक व ऐतिहासीक ठेवा असलेल्या परिसर जगाच्या पाठीवर आता सगळ्यांना समजू लागलेला आहे. परिणामी येथे आता बाराही महिने पर्यटन वाढीस लागले आहे. त्यामुळे सानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

पुणे व मुंबई या शहरातून कोकणात व रायगडमध्ये पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या अधिक आहे. यातील बहुसंख्य पर्यटक व निसर्गप्रेमींची पावले भिरा, पाटणूस, विळे, ताम्हिणी आदी परिसराच्या आसपास वसलेला ऐतिहासिक आणि निसर्गाचा अमूल्य व अचंबित करणारा ठेव्याकडे





वळत आहेत.

जिल्ह्यातील तसेच पुणे व मुंबई येथील पर्यटक पावसाळ्यात ताम्हीणी घाटाला अधिक पसंती देतात. वीकेण्डला तर येथील असंख्य धबधब्यांवर पर्यटकांची तुफान गर्दी असते. अनेकजण सहकुटुंब व मित्र-मैत्रिणींसोबत चिंब भिजण्याचा आनंद लुटतात. दरम्यान, दुसऱ्या महायुद्धातील पराक्रमाबद्दल गौरविलेले वीर यशवंत घाडगे यांच्या पत्नी दिवंगत लक्ष्मी घाडगे यांचे माहेर पाटणूस आहे तसेच पहिल्या महायुद्धात पराक्रम दाखवून धारातीर्थी पडलेल्या येथील ४५ सैनिकांसाठी ब्रिटीशांनी पाटणूस येथे स्मृतीस्तंभ उभारला आहे. पाटणूस येथील कुंडलिका विद्यालयाचे निसर्ग अभ्यासक शिक्षक राम मुंडे यांनी पाच वर्षांपूर्वी इन्क्रेडिबल कोकण ताम्हिणी, विळे, पाटणूस, भिरा हे फेसबुक पेज तयार केले आहे.

येथील हा सर्व अमुल्य ठेवा जगासमोर छायाचित्राच्या माध्यमातून व फेसबूक पेजद्वारे शिक्षक राम मुंढे यांनी उभा केला आहे. मागील १५ वर्षांपासून ते हा संपूर्ण परिसर पिंजून काढत आहेत. येथील दुर्मिळ पक्षी, प्राणी, झाडे, नद्या, नाले, डोंगर व निसर्गाची विविध रुपे त्यांनी आपल्या कॅमेऱ्यात बंदिस्त केली आहेत. एवढेच नाही तर या सगळ्याची शास्त्रशुद्ध माहितीदेखील मिळविली आहे. ही सर्व माहिती व छायाचित्रे ते नियमित या फेसबुक पेजवर टाकत आहेत. अनेक वैशिष्टपूर्ण माहितीमुळे हा संपूर्ण परिसर आता जगासाठी खुला झाला आहे.

## निसर्गाचा अमूल्य ठेवा

माणगाव तालुक्यातील पाटणुस, विळे, भिरा व रवाळजे आदी गावे सह्याद्रीच्या कुशीमध्ये वसली आहेत. या गावाच्या अवतीभोवती सह्याद्रीच्या पर्वत रांगा उभ्या आहेत. या सर्व गावांत व आसपासच्या परिसरात नैसर्गिक जैवविविधता प्रचंड प्रमाणात आहे. त्याचबरोबर सह्याद्रीच्या अंगाखांद्यावरून फेसाळणारे पांढरे शुभ्र धबधबे सरळ खाली येऊन याच ठिकाणावरून पुढे नदी रुपात अरबी समुद्राकडे आगेकूच करतात.


## अचंबित करणारे सारे काही

भिरा येथील देवकुंड हे येथील सर्वात प्रसिद्ध व विलोभनीय ठिकाण आहे. येथूनच कुंडलिका नदीचा उगम होतो. तसेच खजिना डोंगरावरील ट्रॅक प्रसिद्ध आहे. येथे दुर्मिळ गिधाडांचे वस्तीस्थान आहे. या उंच डोंगरावरुन भिऱ्याचे विस्तीर्ण धरण, सह्याद्रीच्या विलोभनीय डोंगररांगा, नद्या, फेसाळणारे धबधबे, व आजूबाजुचा आकर्षक परिसर दृष्टिक्षेपात येते. विळे गावाजवळ बेडगाव येथे देवकुंडप्रमाणे एक कुंड आहे. रवाळजे येथे असलेले व्हाईट वॉटर रिव्हर राफ्टिंग वैशिष्ट्यपूर्ण आहे. भारतात रवाळजासह फक्त जम्मू काश्मिर, उत्तराखंड, मेघालय या ठिकाणीच व्हाईट वॉटर रिव्हर राफ्टिंग चालते. त्यामुळे या ठिकाणाला खूप महत्त्व आहे. भीमा शंकर येथे सापडणारा राज्य प्राणी शेकरू, राज्य पक्षी, राज्य फुलपाखरू, राज्य फुल हे या परिसरात आढळतात. तसेच गिधाडे, बिबटे व इतर दुर्मिळ पशू पक्ष्यांची निवासस्थाने या परिसरात आहेत.

## पर्यटकांसाठी सोयीसुविधा

पाटणूस व विळे-भागाड ग्रामपंचायतीच्या माध्यमातून या भागाचा पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी विविध गोष्टी केल्या जात आहेत. पाटणूस, विळे व म्हसेवाडी येथे दोन चेकपोस्ट उभारण्यात आले आहेत. पर्यटकांना बसण्यासाठी पाटणूस परिसरात बाके बसविण्यात आली आहे. पर्यटकांकडून प्लास्टिक कचरा टाकू नये तसेच खबरदारीच्या सुचना देणारे दर्शनी फलक बसविले आहेत. स्थानिक गाईडना ओळखपत्र दिले आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने पाटणूस परिसरात सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. ग्रामस्थ व पर्यटकांसाठी शुद्ध फिल्टर पाण्याची व्यवस्था केली आहे. हॉटेल व व्यवसायिकांची नोंदणी केली आहे. परिसरात लॉज व हॉटेल व्यावसायिकांना व्यवसायाची योग्य संधी उपलब्ध करुन दिली आहे. माणगाव पोलिसांसोबत पर्यटन व पर्यटकांविषयी वेळोवेळी मिटिंग घेतल्या जातात. एकूणच जिल्ह्यातील निसर्ग गावे पर्यटकांना आकर्षित करत आहेत.

## बदलते तंत्रज्ञान



### मोबाइल हरवला असल्यास घाबरू नका; बंद करा युपीआय अकाउंट

आजच्या आधुनिक युगात मोबाइल ही अतिशय महत्त्वाची गरज झाली आहे. असा हा मोबाइल चोरीस गेल्यास बरेच नुकसान होऊ शकते. या मुळे तो सांभाळणेही तेवढेच गरजेचे आहे. मात्र समजा तुमचा हा मोबाइल चोरीला गेल्यास किंवा हरवल्यास तुम्ही युपीआय खाते सहजपणे कसे बंद करू शकता हे आज जाणून घेऊया. कोरोना काळात डिजिटल पेमेंटचा वापर हा आता प्रत्येकजण करत आहे. डिजिटल पेमेंट पर्यायामुळे व्यवहार करण्यात




खूप मोठी मदत झाली. लोक खरेदीसाठी डिजिटल पेमेंटचा अवलंब करतात. कारण, मोबाईल वापरून युपीआय पेमेंट करणे सोपे आहे. युपीआय पेमेंट पर्यायासह, तुमच्या खिशात पैसे ठेवण्याची गरज संपलीच आहे. स्मार्टफोनच्या मदतीने तुम्ही मोठ्या मॉल्सपासून ते छोट्या किराणा दुकानामध्ये यांच्या माध्यमातून खरेदी करू शकता. कधी घाईगडबडीत जर तुमचा मोबाईल कुठेतरी हरविला आणि तो चुकीच्या व्यक्तीच्या हाती गेला तर ते तुमचे बँक अंकाऊंटदेखील रिकामे करू शकतात. म्हणूनच युपीआय पेमेंटस् वापरताना काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. तुमचा फोन चोरीला गेल्यास किंवा हरवल्यास तुम्ही युपीआय खाते सहजपणे कसे बंद करू शकता हे जाणून घेऊया.

मोबाइल चोरीला गेल्यास किंवा हरवल्यास, सर्वप्रथम तुमच्या मोबाइल नेटवर्कच्या कस्टमर केअर एक्झिक्युटिव्हला कॉल करा आणि तुमचा मोबाइल नंबर आणि सिम त्वरित ब्लॉक करण्यास सांगा. एक्झिक्युटिव्ह तुमचा मोबाइल नंबर वापरून युपीआय पिन तयार करणे प्रतिबंधित करेल. सिम ब्लॉक करण्यासाठी, कस्टमर केअर एक्झिक्युटिव्ह तुम्हाला तुमचे संपूर्ण नाव, बिलिंग पत्ता, शेवटचे रिचार्ज तपशील, ईमेल आयडी इत्यादी तपशील विचारू शकतात. तुम्हाला तुमच्या बँकेच्या हेल्पलाइन नंबरवर कॉल करून तुमचे बँक खाते ब्लॉक करण्यास आणि युपीआय सेवा बंद करण्यास सांगावे लागेल. यानंतर तुम्हाला हरवलेल्या फोनसाठी एफआयआर नोंदवावा लागेल, याचा वापर करून तुम्ही तुमचे सिम आणि बँकिंग सेवा नंतर पुन्हा सुरू करू शकता.

# थोर स्वातंत्र्यवीर लोकमान्य टिळक

**निमित्त**

भारतीय राष्ट्रीय चळवळीचे जनक आणि जाज्वल्य देशभक्त असे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे नाव कोणाला माहीत नाही असे होणारच नाही. मराठी माणसाचा अभिमान म्हणजे लोकमान्य टिळक. एक महान स्वातंत्र्यसेनानी, उत्कृष्ट वक्ते, उत्तम समाजसुधारक, आदर्शवादी असे राष्ट्रीय नेते, तसेच हिंदू धर्म, खगोलशास्त्र, संस्कृत आणि गणित या विषयांचे गाढे अभ्यासक म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या लोकमान्य टिळक यांची ही थोडक्यात माहिती देत आहोत.

बाळ गंगाधर टिळक अर्थात लोकमान्य टिळक यांचा जन्म रत्नागिरी येथे एका ब्राम्हण कुटुंबात २३ जुलै, १८५६ साली झाला. रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली या गावात त्यांचा जन्म झाला. टिळकांचे वडील त्यावेळी एका शाळेत शिक्षक म्हणून काम करत होते. तर संस्कृतचे अगाध ज्ञान त्यांना होते. केवळ १६ व्या वर्षी टिळक वडिलांच्या मायेला पोरके झाले. टिळकांच्या आईचे नाव पार्वतीबाई गंगाधर टिळक. तर वडिलांच्या बदलीनंतर टिळकांचे संपूर्ण कुटुंब हे पुण्यात स्थायिक झाले. त्यामुळे टिळकांनी तेथेच आपले शिक्षण पूर्ण केले. लोकमान्य टिळक हे लहानपणापासूनच अत्यंत हुशार होते. त्यामुळे त्यांचे शाळेतील किस्सेही प्रसिद्ध आहे. त्यांच्या बुद्धिचे आणि त्यांच्या धाडसाचे किस्से आजही लहान मुलांना ऐकविले जातात. गणित हा टिळकांचा अत्यंत आवडता विषय होता. आपल्या वडिलांकडूनच टिळकांनी धडे घेण्यास सुरूवात केली. त्यानंतर त्यांचे शिक्षण पुण्यात झाले. शाळेतील 'मी शेंगा खाल्ल्या नाहीत, तर मी टरफले उचलणार नाही' हा किस्सा खूपच गाजला आहे. त्यांनी फारच लहानपणी वडिलांचे छत्र गमावले. १८७७मध्ये



लोकमान्य टिळकांनी पुण्यातील डेक्कन महाविद्यालयातून पदवी मिळवली. त्या काळात पदवी मिळवणारी व्यक्ती म्हणजे अत्यंत नगण्य होती. अत्यंत हुशार असल्याने टिळकांनी त्याकाळी महाविद्यालयीन पदवी संपादन केली होती.

पुण्यातील डेक्कन महाविद्यालयातून संस्कृत आणि गणितामध्ये बी. ए. ही पदवी लोकमान्य टिळकांनी मिळवली. त्यानंतर मुंबईतील सरकारी लॉ महाविद्यालयात त्यांनी एल. एल. बी. चा अभ्यास पूर्ण केला आणि १८७८मध्ये त्यांनी कायद्याची पदवी प्राप्त केली. शिक्षण संपल्यानंतर लोकमान्य टिळकांनी पुणे येथील एका खासगी शाळेमध्ये गणित आणि इंग्रजी या विषयाचे शिक्षक म्हणून नोकरी पत्करली. मात्र त्यांचे विचार इतर शिक्षक आणि अधिकाऱ्यांशी न जुळल्याने आणि त्यांच्यातील मतभेदांमुळे १८८० मध्ये नोकरी सोडून दिली. यानंतर पत्रकार म्हणून कार्यरत असताना एक सामाजिक चळवळींमध्ये लोकमान्य टिळक सहभागी होऊ लागले. आपल्या भाषणातील ज्वलंत विचारांमुळे टिळक अधिक प्रसिद्ध होऊ लागले. आपले महाविद्यालयीन मित्र आणि समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर आणि विष्णू शास्त्री चिपळूणकर यांच्यासह भारतीय विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाला प्रेरणा देण्यासाठी आणि देशातील तरूणांना उच्च गुणवत्तेचे शिक्षण देण्यासाठी आणि त्यात चांगल्या गुणवत्तेचा दर्जा आणण्यासाठी एकत्र येत 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली. त्यांचे निधन १ ऑगस्ट १९२० मध्ये झाले.

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : येथील समुद्र किनाऱ्यावर ऑईल वाहून आल्यामुळे किनारा विद्रुप झाला आहे. हे ऑईल किनाऱ्यावरील वाळूत जाऊन घट्ट झाले आहे. याचा त्रास पर्यटकांना होत आहे. त्यामुळे तातडीने किनारा स्वच्छ करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

### विविध संक्रमणांपासून स्वत:ला असे वाचवा!

पावसाळा हा संपूर्ण सृष्टीला नवचैतन्य देणारा ऋतु आहे. हिरवागार निसर्ग सगळीकडे नवजीवनाच्या पालवीने फुललेला असतो. या ऋतूत जसे वनस्पतीजगत बहरलेले असते, तसेच थंडावा, दमटपणा व हवेतील वाढलेल्या आर्द्रतेमुळे वातावरणात नाना तऱ्हेचे जीवजंतूही वाढण्याचाही हा काळ असतो. प्रत्येक नाण्याच्या दोन बाजू असतात. तसेच यातील काही जीवजंतू मनुष्याला मदत करणारे तर काही त्रास देणारे असतात. या काळात सर्व प्रकारचे बॅक्टेरिया, व्हायरस, फंगस यांचाही प्रादुर्भाव वाढत असतो. त्यामुळेच संक्रमण रोग, ॲलर्जीमुळे होणारे रोग या काळात वाढताना दिसतात. या काळात आरोग्याची काळजी घ्यावी लागते. त्यातही आपले अवयव म्हणजे आपली इंद्रिये यांची काळजी घेणे तर अतिशय आवश्यक असते.

यामध्ये त्वचा हे आपल्या शरीरातील सगळ्यात मोठे व सर्व शरीरावर पसरलेले ज्ञानेंद्रिय होय. त्वचेला पावसाळ्यात सगळ्यात जास्तीत त्रास सहन करावा लागतो. पावसाळ्यात शरीरात पित्तदोषाची वृद्धी झाल्यामुळे शरीरात तसेही कोरडेपणा वाढलेला असतो. त्वचा कोरडी झालेली असते. या काळात आलेला घाम त्वचेवर जास्त वेळ टिकत असल्यामुळे किंवा पावसामुळे ओले झालेले कपडे त्वचेवर अधिक काळ राहिल्यामुळे इन्फेक्शन होण्याचे तसेच त्वचेचे आजार होण्याचे प्रमाण वाढलेले दिसते. त्वचेची काळजी घेण्याकरता आयुर्वेदिक सिद्ध तेल नियमाने लावणे उत्तम ठरते. यामुळे त्वचेचा कोरडेपणा कमी होतो, तसेच संसर्गापासून दूर राहण्यास मदत मिळते.

पंचज्ञानेंद्रियांपैकी डोळे खूपच महत्त्वाच आहे. या ऋतूत डोळ्यांमध्येही बॅक्टेरिया, व्हायरस, फंगस याचे इन्फेक्शन होण्याची शक्यता अधिक असते. या काळात डोळे येणे, डोळ्यांतून घाण येणे, कोरडेपणा जाणवणे अशा प्रकारचे त्रास होताना दिसतात. डोळ्यांची काळजी घेण्याच्या दृष्टीने शुद्ध व नैसर्गिक घटकांपासून आयुर्वेदिक पद्धतीने बनविलेले सॅन अंजनसारखे काजळ नियमितपणे डोळ्यात घालणे उत्तम ठरते. संतुलन सुनयन तेल डोळ्यांमध्ये घातल्यास इन्फेक्शन होण्यास प्रतिबंध होऊ शकतो. डोळ्यांवर गुलाबपाण्याच्या घड्या ठेवणे फायद्याचे ठरते. ज्यांची या काळात इन्फेक्शन होण्याची प्रवृत्ती असते त्यांना वर्षा ऋतू सुरू होण्यापूर्वीच तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार नेत्रबस्ती करून घेणे उत्तम. या काळात सर्दी, खोकला यासारखे आजार अधिक प्रमाणात होत असल्याने सायनसमध्ये सूज आढळून येते. नाक व सायनस मोकळे राहण्याच्या दृष्टीने शुध्द तूप नाकात घालणे उत्तम असते. याबरोबरच इतरही ज्ञानेंद्रियांची काळजी वेळीच घेतली पाहिजे.

# नेरळ-कळंब-वारे मार्गावर एसटी सेवा सुरु करा

## पालक आणि विद्यार्थ्यांची मागणी

**कर्जत : बातमीदार**

रस्त्याचे काम सुरू असल्याचे कारण देत राज्य परिवहन महामंडळा (एसटी) च्या कर्जत आगाराने नेरळ –वारे–कळंब मार्गावरील बससेवा मागील वर्षभरापासून बंद केली आहे. त्यामुळे त्या परिसरातील विद्यार्थ्यांची तसेच नोकरदार प्रवाशांची गैरसोय होत आहे. नेरळ–कळंब–वारे, ओलमन येथे त्वरीत एसटी सेवा सुरु करावी, अशी मागणी विद्यार्थी आणि पालकांनी केली आहे.

आदिवासी बहुल कळंब परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी नेरळ तसेच पोशीर येथे जावे लागते. मात्र एसटी बस सेवा बंद असल्याने त्यांना खाजगी प्रवासी वाहनावर अवलंबून राहावे लागत आहे. त्याचा गैरफायदा खाजगी टॅक्सी–रिक्षावाले घेत आहेत. ते कळंबपासून नेरळपर्यंतच्या १२ किलोमीटर अंतरासाठी प्रति प्रवासी ३० ते ४० रुपये भाडे घेत आहेत. हा प्रवास खर्च पालकांना परवडत नसल्याने काही पालक आपल्या पाल्यास शाळा, कॉलेजमध्ये पाठवत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे लवकरात लवकर वारे–कळंब मार्गावरील बस फेऱ्या सुरू कराव्यात, अशी मागणी या भागातील विद्यार्थी व पालक करीत आहेत.



या भागात मोठ्या संख्येने आदिवासी बांधव राहत असून ते प्रामुख्याने भाजीपाला पिकवत आहेत. हा भाजीपाला घेऊन त्यांना जवळची बाजारपेठ म्हणून नेरळ येथे जावे लागते. एसटी सेवा बंद असल्याने प्रवासाला जास्तीचे पैसे मोजावे लागत आहेत. याशिवाय दररोज कामानिमित्त प्रवास करणाऱ्यांची संख्या ही जास्त आहे. एसटीच्या बस सेवा सुरू झाल्यास वेळापत्रकाप्रमाणे रात्री घरी जाता येते. त्यामुळे कर्जत तालुक्यातील सर्वात जास्त उत्पन्न असणाऱ्या नेरळ –कळंब एसटीच्या फेऱ्या कर्जत आगाराने लवकरात लवकर सुरू कराव्यात अशी मागणी होत आहे.

> **कळंब विभागात बहुतांश आदिवासी राहत असून अनेक मुले शाळा, कॉलेजमध्ये नेरळ आणि पोशीर या ठिकाणी जात आहेत. मात्र एसटी सेवा बंद असल्याने त्यांना खाजगी वाहनाने प्रवास करावा लागत असून, ते परवडत नसल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर विपरित परिणाम झाला आहे.**
>
> **–कृष्णा बदे, माजी सरपंच, कळंब, ता. कर्जत**

# ग्रामपंचायती झाल्या भ्रष्टाचाराचे कुरण

## खालापुरात पंचायत समितीचा अंकुशच नाही

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील श्रीमंत ग्रामपंचायत असलेल्या वासांबे ग्रामपंचायत सरपंच ताई पवार यांच्यावर भ्रष्टाचाराचा ठपका ठेवून पदावरून हकलपट्टी आणि त्यात सहभागी चार ग्रामविकास अधिकारी यांचे निलंबनाचा आदेश नुकताच कोकण विभागीय आयुक्तांनी दिला आहे. याप्रकरणामुळे खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायतींचा कारभार हाकणाऱ्या पंचायत समितीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

खालापूर तालुका मुंबई–पुणे महामार्गालगत, औद्योगिक प्रगती पुढे असूनदेखील तालुक्यात गावोगावी विकासाची गंगा पोहचलेली नाही. खालापूर तालुक्यात चव्वेचाळीस ग्रामपंचायती आहेत. या ग्रामपंचायतीचा कारभार तालुका पंचायत समिती मार्फत चालविला जातो. मात्र गेल्या अनेक वर्षापासून खालापूर तालुक्यातील अनेक गावातील पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा, अंगणवाड्या, शाळा आणि स्वच्छतेचा बोजवारा उडाला आहे. प्रशासकिय यंत्रणेचा कोणताही वचक नसल्यामुळे कारभारात सुसूत्रता आणि ताळमेळ उरलेला नाही. तालुक्यातील ग्रामपंचायतीमधील भ्रष्टाचाराविरोधात माहिती अधिकार कार्यकर्ते महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. भ्रष्टाचार उघडकीस येईपर्यंत वरिष्ठ अधिकारी डोळ्यावर झापड लावून बसलेत का? असा प्रश्न चौक ग्रामपंचायतीचा भ्रष्टाचार उघडकीस आणणारे सुरेश गावडे यांनी केला आहे. पंचायत समितीचे वरिष्ठ अधिकारी एखादी घटना घडल्यानंतर जागे होत असून, नियमित दप्तर तपासणी होत नसल्याने ग्रामपंचायत भ्रष्टाचाराचे कुरण बनले आहे. स्वच्छता मोहिमेचा तालुक्यात बोजवारा उडला आहे. तालुक्यातील चौक, सावरोली, लोधिवली ग्रामपंचायतीत मोठा भ्रष्टाचार उघडकीस आला होता. काही ठिकाणी कारवाईदेखील झाली. परंतु त्यानंतर पुन्हा ये रे माझ्या मागल्या सुरू आहे.

> **ग्रामपंचायतीच्या कामाची वेळोवेळी दप्तर तपासणी केली आणि नागरिकांच्या तक्रारींची वेळीच दखल घेतली तर भ्रष्टाचाराला आळा बसेल. परंतु वरिष्ठ अधिकारी त्यांना पाठिशी घालत आहेत. पंचायत समितीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशीसाठी पाठपुरावा सुरू असून वेळ प्रसंगी न्यायालयात जाण्याची तयारी आहे.**
>
> **–सुरेश गावडे, माहिती अधिकार कार्यकर्ता, चौक, ता. खालापूर**

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त

# नागाव येथे खेळणी, वह्या वाटप





**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसा निमित्ताने भारतीय जनता पक्षातर्फे शुक्रवारी (दि. २२) नागाव (ता. अलिबाग) येथील अंगणवाडीमध्ये मुलांना खेळणी व प्राथमिक शाळेतील मुलांना वह्या वाटप करण्यात आले.

भाजपचे राज्य परिषद सदस्य सतीश लेले, जिल्हा चिटणीस समीर राणे, तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, जिल्हा युवा मोर्चा सरचिटणीस शौकीन राणे, तालुका अध्यक्ष अलाप मढवी, पंचायत समितीचे माजी सदस्य उदय काठे, सांस्कृतिक प्रकोष्ठ जिल्हा संयोजक केदार आठवले, नागांव अध्यक्ष प्रसाद आठवले, सौरभ आपटे, विभाग अध्यक्ष अजिंक्य पाटील, अरविंद पाटील, अमेय आठवले, अभय मोडक यांच्यासह विद्यार्थी व शिक्षक या वेळी उपस्थित होते. भाजपचे जिल्हा चिटणीस समीर राणे व सतिश लेले यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

## रोह्यात वृक्षारोपण

**धाटाव : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दक्षिण रायगड भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने रोहा तालुक्यातील देवकान्हे येथे शुक्रवारी (दि. २२) वृक्षलागवड करण्यात आली.

भारतीय जनता युवा मोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अमित घाग, रोहा तालुका सरचिटणीस अविनाश कान्हेकर, शहर अध्यक्ष निलेश धुमाळ, भाजप महिला मोर्चाच्या सरचिटणीस श्रद्धा घाग, तसेच जितेंद्र सुटे, अमोल कोंडे, दिनेश सुटे, हरिश्चंद्र कोंडे, विनोद सुटे, विश्वनाथ थिटे, गणेश थिटे, भरत कान्हेकर, आर्यन सुटे, उमाकांत जंगम यांच्यासह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.



# द्रौपदी मुर्मू यांच्या विजयाबद्दल रोह्यात आनंदोत्सव

**धाटाव : प्रतिनिधी**

राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत गुरुवारी एनडीएच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांनी विजयी झाल्या. त्याबद्दल भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने शुक्रवारी (दि. २२) रोह्यात आंनदोत्सव साजरा करण्यात आला. तालुक्यातील तळवली आदिवासी वाडीत एकमेकांना लाडू भरवून आनंद व्यक्त करण्यात आला.

भारतीय जनता युवा मोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अमित घाग, रोहा तालुका सरचिटणीस अविनाश कान्हेकर, शहर अध्यक्ष निलेश धुमाळ, भाजप महिला मोर्चाच्या सरचिटणीस श्रद्धा घाग, तळवली सरपंच रघुनाथ कोस्तेकर तसेच जितेंद्र सुटे, अमोल कोंडे, दिनेश सुटे, अविनाश काहेकर, हरिशचंद्र कोंडे, विनोद सुटे, विश्वनाथ थिटे, गणेश थिटे, भरत कान्हेकर, आर्यन सुटे, उमाकांत जंगम यांच्यासह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व अदिवासी बाधंव उपस्थित होते.

## भाजप युवा मोर्चातर्फे तळवली आदिवासी वाडीत लाडू वाटप

> **आदिवासी समाजातील द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपतीपदी निवड झाल्याबद्दल आम्हाला अभिमान वाटतो. त्या आमच्या समाजाला नक्की चांगल्या प्रवाहात आणतील अशी अपेक्षा आहे.**
>
> **–गुलाब वाघमारे, ग्रामस्थ, तळवली आदिवासी वाडी, ता. रोहा**



## आदिवासी समाजासाठी अभिमान व आनंदाचा दिवस -आदिवासी समाज जिल्हाध्यक्ष भगवान नाईक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपती पदावर निवड झाल्याने आदिवासी समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. हा सोनियाचा दिवस असून आदिवासी समाजासाठी अभिमानाचा व आनंदाचा दिवस असल्याचे प्रतिक्रिया रायगड जिल्हा आदिवासी समाज अध्यक्ष भगवाना नाईक यांनी व्यक्त केली.



राष्ट्रपतीपदावर निवडून आलेल्या द्रौपदी मुर्मू या आदिवासी समाजाच्या आहेत, त्याची राष्ट्रपतीपदावर निवड झाल्यानंतर आदिवासी समाजात उत्साहाचे वातावरण पसरले, आदिवासी समाजाच्या वतीने जिल्हा जिल्हाध्यक्ष भगवाना नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली ठिकठिकाणी बॅनर उभारून शुभेच्छा व अभिनदंनाचा वर्षाव करण्यात येत आहे.

# घरोघरी तिरंगा फडकवूया!

**भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायक / क्रांतिकारक /स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, तसेच स्वातंत्र्यासाठी चेतविलेले स्फुल्लिंग कायम तेवत राहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरूपी जनमानसात राहावी, या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी १३ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या अनुषंगाने पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन परिपत्रकान्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य सरकारने हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा अभियानासाठी ग्रामीण विकास विभागास राज्य समन्वय संस्था म्हणून नामनिर्देशित केले आहे. शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाने या उपक्रमाबाबतच्या दिलेल्या महत्वाच्या सूचना जाणून घेवू, या लेखाच्या माध्यमातून...**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार १३ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत राज्यातील प्रत्येक नागरिकांच्या घरावर तसेच सर्व शासकीय/निमशासकीय/खाजगी अस्थापना/ सहकारी संस्था/शैक्षणिक संस्था यांच्या इमारतीवर राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयंस्फूर्तीने करणे अपेक्षित आहे.

तिरंगा हा नि:शुल्क असणार नाही, नागरिकांनी तो स्वच्छेने विकत घेण्यासाठी लोकांना प्रेरित करण्यात यावे. प्रत्येक जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदेला आवश्यक असलेल्या ध्वजांची संख्या निश्चित करणे महत्त्वाचे आहे.

या उपक्रमासाठी ग्रामीण भागात जवळपास १.४६ कोटी कुटुंबे/घरे असून इतर कार्यालये, संस्था मिळून १.५० कोटी ध्वज फडकवता येईल असा अंदाज आहे.

विविध स्तरातून सहकार्य मिळविण्यासाठी शाळा–कॉलेजेस, एनसीसी, एनएसएस, स्वयंसहाय्यता समूह, युवा मंडळ इत्यादींमधून तिरंगा वॉलेंटियर्स म्हणून नियुक्त करणे, तसेच स्थानिक स्तरावरून पालकमंत्री, खासदार, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकारी सदस्य, इतर प्रतिष्ठित नागरिक, खेळाडू, अधिकारी यांच्याद्वारे नागरिकांना हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा अभियानाबाबत आवाहन करण्यात यावे.

प्रत्येक नागरिकाने भारतीय ध्वज संहिता, २००६ चे पालन करावे, याकरिता नागरिकांना माहिती देण्यात यावी. या लिंकद्वारे भारतीय ध्वज संहिता, २००६ ची सविस्तर माहिती उपलब्ध आहे.

केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामपंचायत स्तरावरील ग्रामपंचायत व विविध सरकारी कार्यालये/संस्था हे साठवणूक आणि विक्री केंद्र असतील.

महाराष्ट्रात खालीलप्रमाणे तिरंगा झेंडा पुरवठादार आहेत, जेथून ठोक स्वरुपात आपण झेंडा खरेदी करू शकता.



१. खादी ग्रामोद्योग आयोग (KVIC)
२. भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ मर्या. (NCCF) केंद्र सरकार उपक्रम.
३. ऋएच् पोर्टल
४. स्थानिक विक्रेते, स्वयंसहाय्यता महिला समूह इ.
५. Indiamart सारखी ऑनलाइन खरेदी
६. याशिवाय मुंबईत द फ्लॅग कंपनी वसई, द फ्लॅग शॉप इ.

तसेच भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाकडून कळविण्यात आलेले काही तिरंगा पुरवठादारांचे संपर्क: कबीर कुमार– ७०९१४७२५५५, ८८००२६५७७९, इमेल– aniratcontracts@gmail.com याप्रमाणे असून मुंबईतील आणखी एक पुरवठादार पुष्कर नाईक– ८८००४८८०३०, ९८६९५८८३२५ हे असून यांनी NCCF आणि खरेदीदार यांच्यात समन्वय साधून तालुकास्तरावर झेंडे वाटपाची तयारी दर्शविली आहे.

या विक्रेत्यांना किंवा स्थानिक विक्रेत्यांना आपल्या जिल्ह्यातील आवश्यक घरांच्या संख्येनुसार पुरवठा आदेश दिला जाऊ शकतो.

तिरंगा झेंडा साठवणूक केलेल्या ग्रामपंचायत येथून स्थानिक नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने तिरंगा खरेदी करण्याबाबत ग्रामपंचायत क्षेत्रात जाणीवजागृती निर्माण करून हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा उपक्रम यशस्वी करण्यात यावा.

हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील घरांची, संस्थाची निश्चिती, त्यासाठी आवश्यक झेंडेची संख्या, त्यांची खरेदी, वितरण, उत्पादन, प्रत्यक्षात झेंडे लावणे इ. सर्व बाबींची पूर्तता, संपूर्ण नियोजन जिल्हास्तरावरून करण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनावर सोपविण्यात आली आहे.

**या उपक्रमाची जिल्हास्तरीय कार्यान्वयन समिती पुढीलप्रमाणे**

**अध्यक्ष :** जिल्हाधिकारी
**सह–अध्यक्ष :** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
**उपाध्यक्ष :** पोलीस अधीक्षक
**सदस्य :** विद्यापीठाचे कुलसचिव द्वारा प्रतिनिधी, नगरपालिका मुख्याधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा क्रीडा अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी, महाव्यवस्थापक–जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी, चड्ठड्च् समन्वयक.
**सदस्य सचिव :** जिल्हा परिषद, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

रायगड जिल्ह्यात हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी केले आहे.

**–मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी, रायगड–अलिबाग**

# जिल्ह्यात १३ ऑगस्टला राष्ट्रीय लोकअदालत

**अलिबाग : जिमाका**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या आदेशानुसार रायगड जिल्ह्यात १३ ऑगस्ट २०२२ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल अ. शिंदे यांनी कळविले आहे.

न्यायालयात प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे १३८ एनआय ॲक्ट खालील प्रकरणे, दिवाणी अपिले, तडजोडपात्र पालिका व ग्रामपंचायत यांच्या घरपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूरसंचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये प्रकरणे तडजोडीने निकाली केल्यास लोकांचा पैसा आणि वेळ यांचा अपव्यय होत नाही, पक्षकारांना तात्काळ न्याय मिळतो. न्यायालयात भरलेले कोर्ट शुल्क परत मिळते. त्यामुळे १३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष एस. एस. सावंत यांनी केले आहे.


## नावात बदल

माझे जुने नाव **रुकनुद्दीन हिसामुद्दीन** राहणार मुस्लीम मोहल्ला इरफान पाव वालेची चाळ, मु. वडघर चिंचपाडा, ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६ राज्य महाराष्ट्र, हे माझे जुने नाव असून, मी **प्रतिज्ञापत्र क्र. ४९७ दि. २२/७/२०२२** रोजी रुकमुद्दीन ईसामुद्दीन काजी असे बदलले असून, या पुढे मी **रुकमुद्दीन ईसामुद्दीन काजी** या नवीन नावाने ओळखला जाईल.

दि.
पनवेल

**सही/–**
**रुकमुद्दीन ईसामुद्दीन काजी**
**नवीन नाव**

# पाणी प्रश्नावरून कामोठे भाजपचा सिडकोला दणका

## ३८ एमएलडी पाणी देण्याचे अभियंत्यांकडून आश्वासन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या अनेक दिवसांपासून कामोठे परिसरात पाणीसमस्या निर्माण झाली आहे. याबाबत सिडकोला वारंवार पत्रव्यवहार केल्यानंतरही दुर्लक्ष करण्यात आले होते. अखेर कामोठेतील भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी (दि. २२) सिडको कार्यालयात धडक दिली.

पाणीपुरवठा विभागाचे चिफ इंजिनियर यांच्याशी चर्चा करून तसेच नवी मुंबई महानगरपालिकेचे सिटी इंजिनियर देसाई यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर त्यांनी कामोठ्याला उद्यापासून रोज ३८ एमएलडी पाणी देण्याचे आश्वासन दिले असून कामोठ्यातील जनतेचा पाण्याचा त्रास लवकरच दूर होणार आहे.

पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी वारंवार पाठपुरावा करून तसेच कामोठे प्रभाग क्रमांक १३च्या नगरसेविका हेमलता गोवारी यांनी पाण्याच्या समस्येसंबंधी वेळोवेळी पत्रव्यवहार करून व अधिकाऱ्यांना कामोठेच्या जनतेची पाण्यामुळे होणारी गैरसोय लक्षात आणून दिली.




सध्या पाऊस पूरक प्रमाणात झाल्याने कामोठेच्या जनतेला पाण्यासाठी त्रास सहन करावा लागणार नाही, असे आश्वासन देत उद्यापासून दररोज ३८ एमएलडी पाणीपुरवठा करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.

या वेळी नगरसेवक विकास घरत, सामाजिक कार्यकर्ते भाऊ भगत, भाजप कामोठे महामंत्री सुशीलकुमार शर्मा, सुधीर जाधव, सुषमा बारस्कर, शुभांगी कदम व इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## कळसखंड येथे चारसूत्री भातलागवडीचे प्रात्यक्षिक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कसळखंड येथील प्रगत शेतकरी कमळाकर धोंडू घरत यांचे शेतात चारसूत्री पद्धतीने भात लागवड करण्यात आली आहे. अशोका सीड्स कंपनीचे दोन किलो भात बियाणे लागवड करण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यासाठी तालुका कृषी कार्यालयातील कृषी पर्यवेक्षक टि. एन. दोलतोडे आणि कृषी सहाय्यक मनिषा वळसे स्वत: शेतात उतरून शेतकऱ्यांसोबत भात लागवड प्रात्यक्षिक करून मार्गदर्शन केले.



दरम्यान चारसुत्री भात लागवड केल्यास शेतात भात उत्पादन वाढणार असून अशा लागवडीमुळे दोन्ही रोपांतील अंतर समांतर राहिल्याने हवा खेळती राहून सूर्यप्रकाश सगळ्या रोपांना मिळतो. त्यामुळे रोपांची वाढ झपाट्याने होते. रोपे दोन ते तीन काड्या लावल्याने त्यांना फुटवे चांगले फुटतात, असे कमळाकर धोंडू घरत यांनी बोलताना सांगितले.



## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवारी (दि. २०) माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे फुलस्टॅक डेव्हलपमेंट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी अ‍ॅनोटेशन इन्फोटेक एलएलपीचे हरीश तडका हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते, तसेच रश्मी बसानी आणि ऐश्वर्या माहिते यांनी सहकार्य केले.

या कार्यशाळेचे आयोजन माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या प्रा. मिनल माडवे तसेच राजश्री व प्रेरणा सातव यांनी सहकार्य केले. कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांनी आवर्जून सहभाग घेतला व उपस्थित मान्यवरांकडून माहिती तंत्रज्ञान विषयाबद्दल असणाऱ्या शंकांचे निरसन करून घेतले.

कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड तसेच संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्राध्यापकांचे कौतुक केले, तसेच कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख व संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## पनवेलच्या उरण नाक्यावर पोलीस चौकी उभारावी

### रहिवासी संघटनेचे पनवेल शहर पोलिसांना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील उरण नाका येथे पोलीस चौकी उभारण्यासंदर्भात रहिवासी संघटनेतर्फे पनवेल शहर पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले.

या वेळी संघटनेच्या प्रतिनिधींनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्याशी चर्चा करून त्यांना परिसरातील विविध समस्यांबाबत सांगितले, तसेच उपाययोजना करण्याची मागणी केली. या वेळी संघटनेचे राहुल केदारे, मंगेश पिलविळकर, अभिजित तुरकर, प्रगती गायकवाड, निलेश बुरकर, विद्या चव्हाण, अर्वाह टीनवाला, रशिदा कागलवाला, तसनीम कंटावाला, अलेफीया बिजलीवाला, कैझार मालक, जुमाना सलीम, मंगला गंजी आणि परिसरातील इतर रहिवासी उपस्थित होते.





**पनवेल : पनवेल ते खांदा कॉलनीला जोडणाऱ्या पुलासमोर खड्डे पडल्याने वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. ही बाब लक्षात घेत माजी उपमहापौर सीताताई पाटील यांनी शुक्रवारी वाहतूक विभाग तसेच सिडको विभागातील अधिकारी यांच्याशी संपर्क साधून तातडीने रस्त्यावर काँक्रिट टाकून रस्त्याचे काम करून घेतले. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.**

## मालमत्ता विभागातील प्रलंबित ८८० प्रकरणे निकाली

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेतील मालमत्ता विभागात मागील दोन वर्षांपासून प्रलंबित असलेली शेकडो प्रकरण या विभागाने निकाली काढली असल्याची माहिती पालिका उपायुक्त गणेश शेटे यांनी दिली.

पालिकेच्या मालमत्ता विभागाला मागील दोन वर्षांपासून मालमत्ता करवसुलीचे मोठे टार्गेट आहे. नव्याने लागू करण्यात आलेल्या मालमत्ता करप्रणाली वरून मागील पाच वर्षांचा एकत्रित पूर्वलक्षी प्रभावानुसार करवसुलीचा हा टार्गेट असल्याने संपूर्ण यंत्रणा कर वसुलीकडे लागली असताना मालमत्ता विभागाचे प्रमुख उपायुक्त गणेश शेटे यांनी पुढाकार घेत या विभागातील सुमारे ८८० प्रकरणे निकाली काढली आहेत.

यामध्ये ४०० प्रकरणांचे फेरफार मंजुर केले असून उर्वरित ४८० प्रकरानात त्रुटी असल्याची माहिती संबंधितांना दिली आहे. मंजूर करण्यात आलेल्या प्रकरणांची माहिती पालिकेच्या संकेतस्थळावर अपलोड केली असल्याचे शेटे यांनी सांगितले.



**पनवेल : मानसी सामाजिक व शैक्षणिक शिक्षण संस्थेतर्फे शुक्रवारी पनवेलमधील सेंट अ‍ॅड्रुज स्कुलमध्ये झालेल्या कार्यक्रमात सीकेटी मराठी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर यांना त्यांच्या गिर्यारोहण व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला माऊली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनंता धर्णेकर, आंतरराष्ट्रीय व्याख्याता डॉ. दिनेश गुप्ता व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गुरूनाथ पोळ उपस्थित होते.**

## आडिवलीतील सात गोदामांवर पनवेल महापालिकेची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेच्या क्षेत्रात आडिवली येथे उभारण्यात आलेले सात अनधिकृत गोदामे पालिका प्रशासनाने जमीनदोस्त केले. उपायुक्त कैलास गावडे यांच्या मार्गदर्शनाने ही कारवाई करण्यात आली.

रायगड–ठाणे जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या आडिवली या ठिकाणी असणाऱ्या सात अनधिकृत गोडाउनवर अतिक्रमण विरोधी विभागामार्फत तोडक कारवाई करण्यात आली. या बांधकाम धारकांना नोटीस बजावण्यात आली होती, परंतु योग्य ती कागदपत्रे सादर करण्यात न आल्याने या गोडाऊनवर कारवाई करण्यात आली असल्याची माहिती उपायुक्त कैलास गावडे यांनी दिली.

या वेळी उपायुक्त कैलास गावडे, प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी व अरविंद पाटील उपस्थित होते. जेसीबीच्या साहाय्याने ही गोदामे जमीनदोस्त करण्यात आली. या वेळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यापुढे देखील अशा अनधिकृत बांधकामांवर ही कारवाई सुरूच राहणार असल्याचे उपायुक्त कैलास गावडे यांनी सांगितले.

## ज्येष्ठ नागरिक संघाची वर्षासहल उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रतीवर्षीप्रमाणे पनवेल शहर ज्येष्ठ नागरिक संघाची वर्षासहल (दि. २०) उत्साहात झाली.



रस्त्याने निसर्गसौंदर्याचे दर्शन घेत पूर्व नियोजित नडाळ गावात पंचायतन देवस्थानी एकूण २०० बंधू–भगिनींचे ट्रस्टींच्या सेवकांनी स्वागत केले. प्रथम श्रीसद्‌गुरू साईनाथांचे दर्शन, बाजूस श्री गणेश, श्री बजरंगबली हनुमंत, नडाळेश्वर (श्रीशंकर) व श्री दुर्गादेवीचे दर्शन घेतले. या ठिकाणी प्रथम इशप्रार्थना करून बंधू–भगिनींनी करमणुकीचे कार्यक्रम सादर केले. शिवाय नुकत्याच होऊन गेलेल्या देवशयनी आषाढी एकादशीचे औचित्य साधून सभागृहात श्री विठ्ठल माऊलीच्या गजरांत पालखी सोहळ्याचे आयोजन केले होते. त्यानंतर पंचायतन सभागृहात साप्ताहिक बैठक झाली.

सभेचे सूत्रसंचालन सचिव सुनील खेडेकर यांनी केले. सभासदांचे वाढ दिवस साजरे झाले. सचिव व उपाध्यक्षा गोसावी यांनी काही सूचना दिल्या. याच सभेत नवनिर्वाचित कार्यकारिणीस अध्यक्ष गुर्जर यांच्या माध्यमातून सुनील खंडागळे व अजीत रॉय यांनी शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. माधुरी कोल्हापुरे यांच्या सुस्वर आवाजातील पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## स्वातंत्र्यविरांचे बलिदान व्यर्थ जाऊ नये –शिवव्याख्याते प्रशांत देशमुख

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेकांनी प्राणत्याग केलेला आहे. त्यांचे बलिदान व्यर्थ जाऊ नये, असे आपले वर्तन आणि काम असायला हवे, असे आवाहन शिव्याख्याते प्रशांत देशमुख यांनी केले.



हर घर झेंडा हा उपक्रम ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्टदरम्यान राबविण्यात येणार आहे. त्या संदर्भात गटविकास अधिकारी बालाजी पुरी यांनी अंगणवाडी सेविका, मदतनीस व ग्रामपंचायतीची बैठक घेतली होती. त्या वेळी ते बोलत होते.

गटविकास अधिकारी बालाजी पुरी यांनी, ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागाकरिता ग्रामपंचायतीने जागरूकता दाखवावी, झेंडे पुरविण्याचे काम ग्रामपंचायत, पंचायत समितीमार्फत करेल, असे सांगितले. कार्यक्रमाला एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी गायकवाड, आरोग्य अधिकारी अमित म्हसकर, स. ग. विकास अधिकारी महादेव शिंदे, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मदतनीस उपस्थित होत्या.

## जादा पावसामुळे पालेभाज्यांची नासाडी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गेले काही दिवस राज्यभरात होत असलेल्या जोरदार पावसामुळे मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत भाजीपाल्याची आवक कमी होत आहे. त्यात पावसामुळे एकूण आवक होत असलेल्या शेतमालातील ३० टक्के माल खराब निघत आहे. त्यामुळे भाजीपाल्याचे दर गेल्या आठ दिवसांपासून सातत्याने वाढत आहे.

घाऊक बाजारातच भाज्या ५० ते १०० रुपये किलोपर्यंत गेल्या आहेत. एपीएमसीतील घाऊक भाजीपाला बाजारात फरसबीचे प्रतिकिलोचे दर १२० रुपये किलोपर्यंत गेले असून भेंडी ८० रुपये तर गवारीला ९० रुपयांपर्यंत दर मिळत आहे.

### घाऊक दरात वाढ

राज्यभरात गेले काही दिवस जोरदार पाऊस सुरू आहे. त्याचा परिणाम भाजीपाला उत्पादनावर झाला आहे. राज्याबरोबर परराज्यातून होणारी आवकही कमी होत आहे.

वाशीतील एपीएमसीतील भाजीपाला बाजारात मागील आठवड्यात ६००हून अधिक गाड्या भाजीपाला आवक होत होती. या आठवड्यात ४०० ते ५०० गाड्या आवक होत आहे. त्यात पावसामुळे भाजीपाला बाजारात येईपर्यंत खराब होत आहे. आवक होत असलेल्या शेतमालापैकी ३० टक्के मालाची नासाडी होत आहे. त्यामुळे मागणी तेवढा पुरवठा होत नसल्याने दरात वाढ झाली आहे. भेंडी, गवार, फरसबी, वांगी आणि पालेभाज्या यांचे दर वाढले आहेत.

**भाजीपाला मोठ्या प्रमाणात खराब होत आहे. त्यात आवकही कमी आहे. त्यामुळे दर वाढले आहेत. पावसाचा जोर कायम राहिला, तर पुढील दोन महिने दर चढेच राहणार आहेत.**
**–नाना बोरकर, भाजीपाला व्यापारी**



(संग्रहित छायाचित्र)

## नवीन पनवेलमध्ये उद्या ध्यानसाधना कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री धूतपापेश्वर आयुर्वेद ट्रस्ट संचलित इन्स्टिट्यूट ऑफ योग अ‍ॅण्ड आयुर्वेद व पनवेल आरोग्य सेवा समितीतर्फे नवीन पनवेलमध्ये ध्यानसाधना कार्यशाळेचे रविवारी (दि. २४) आयोजन करण्यात आले आहे.

इन्स्टिट्यूट ऑफ योग अ‍ॅण्ड आयुर्वेद व पनवेल आरोग्य सेवा समितीतर्फे नवीन पनवेल येथील के. आ. बांठिया हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या सभागृहात रविवारी सकाळी ७ वाजता ध्यानसाधना कार्यशाळेचे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यशाळेत मुंबई येथील योगविद्या उपपिठाधिकारी, योगशिक्षक व निसर्गोपचार तज्ज्ञ दुर्गादास सावंत यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार आहे. या कार्यशाळेला मोठ्या संख्येने योगप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन आरोग्य सेवा समितीचे अध्यक्ष मधुसूदन जोशी, उपाध्यक्ष सुरेश जाधव, योगकेंद्र प्रमुख सूर्यकांत फडके, कार्यक्रम प्रमुख गीता गुप्ता यांनी केले आहे.

वाचाल तर वाचाल!
जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

दैनिक राम प्रहरच्या अंकात नवे पाक्षिक सदर 'वाचाल तर वाचाल!' सुरू झालेले आहे.
या सदरात
साहित्यिकांची आवडती पुस्तके दर महिन्याच्या पहिल्या व चौथ्या रविवारी
आपल्या भेटीला आणत आहोत.
आपला अंक राखून ठेवा...!



# पेणमधील शेतकऱ्यांवर अस्मानी संकट

## नुकसानीचे पंचनामे करा; आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रशासनाला सूचना



**पेण : प्रतिनिधी**

जुलै महिन्यात मुसळधार पावसाने धुमाकूळ घातल्याने शेतात पाणी साठून पेण तालुक्यात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. शेतात साचलेल्या पाण्यात भाताची रोपे कुजून शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्याची दखल घेऊन आमदार रविशेठ पाटील यांनी प्रशासनाला तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

भारतीय हवामान शास्त्र विभागाने जाहीर केलेल्या अंदाजानुसार जुलै महिन्यात पेण तालुक्यात पावसाचे रौद्ररूप पहावयास मिळाले. जुलै महिन्यात सात दिवसात तब्बल ४८९ मिलिमीटर पाऊस पडला. या पावसामुळे तालुक्यातील नदी, नाले, ओढे, धरणे ओसांडून वाहू लागले असून सगळीकडे पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाली. शिवारातील भात शेती पाण्याखाली गेल्याने लागवडी योग्य तयार झालेली रोपे पाण्यात कुजली, पावसाच्या पाण्यात मातीमोल झाली आहेत. पावसाच्या अस्मानी संकटामुळे पेण तालुक्यातील तब्बल नऊ हजार हेक्टर भातशेती लागवडी अभावी पडीक राहणार असल्याचे विदारक चित्र शिवारातील पाणी ओसरल्यावर दिसून आल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. ओल्या दुष्काळाचे सावट प्रामुख्याने पेण खारेपाटात दिसत आहे.

लागवडीसाठी रोपे नसल्याने शेतात लागवड कशी होणार, आता नव्याने पीक तयार करताना बियाणे, खते यासाठी पैसा कुठून आणायचा अशा अडचणीत पेण तालुक्यातील शेतकरी सापडले आहेत. त्याची दखल घेऊन आमदार रविशेठ पाटील यांनी, नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई द्यावी, अशा सूचना केल्या.

# कडाव परिसरातील शेतकऱ्यांना मिळणार न्याय

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**



मुंबईस्थित काही फार्महाऊस मालकांनी पावसाचे पाणी वाहून जाणाऱ्या नैसर्गिक मार्गात अडथळा निर्माण केल्याने यंदा कडाव परिसरातील भात शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. याबाबत ग्रामपंचायतीने हात झटकल्याने बाधीत शेतकऱ्यांनी कर्जत तहसीलदारांकडे दाद मागितली होती. तहसीलदारांनी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले असून ते यातून मार्ग काढणार असल्याने कडावमधील बाधीत शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

कर्जत तालुक्यातील कडाव परिसरात काही धनदांडग्या फार्महाऊस मालकांनी पाण्याच्या नैसर्गिक मार्गावर अडथळा निर्माण केल्याने पावसाचे पाणी शेतात साचले. त्यामुळे शेतीला तलावाचे स्वरूप प्राप्त झाल्याने परिसरातील अनेक शेतकऱ्यांना आपली भात शेती करता आली नाही. ही बाब येथील शेतकऱ्यांनी जानेवारी महिन्यात कडाव ग्रामपंचायतीला लेखी अर्ज करुन कळवली होती. मात्र ग्रामपंचायतीकडून काहीही दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे पावसाळी हंगामात शेतात अतिप्रमाणात पाणी साचल्याने शेतकऱ्यांना भाताचे राब पेरता आले नाहीत तसेच ज्या शेतकऱ्यांनी राब पेरले होते ते कुजले. शिवाय शेतात खडी, मातीदेखील जमा झाली.

पावसाचे पाणी वाहून जाणारा नैसर्गिक मार्ग बंद होऊन शेतीचे नुकसान झाल्याबाबत शेतकऱ्यांनी पुन्हा कडाव ग्रामपंचायत व कर्जत तहसील कार्यालयात अर्ज केले. कडाव ग्रामपंचायतीनेदेखील तहसील कार्यालयास सविस्तर माहिती कळवून आता आमची जबाबदारी नाही, जी काही कारवाई होईल ती तहसीलदार करतील असे म्हणून आपली जबाबदारी झटकली. मात्र सदरच्या गंभीर बाबीची दखल तहसीलदार विक्रम देशमुख यांनी घेतली व कडावचे तलाठी व मंडळ अधिकारी यांना पंचनामा करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. त्यानुसार कडाव तलाठी व मंडळ अधिकारी यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी व पंचनामा करुन तहसीलदारांना अहवाल सादर केला आहे. तहसीलदार देशमुख हेदेखील लवकरच कडाव परिसरातील शेतीची प्रत्यक्ष पाहणी करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करणार असल्याने येथील बाधीत शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

# शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केली दरडप्रवण गावांमध्ये टेहळणी

**अलिबाग : जिमाका**

पावसाळ्यातील संभाव्य आपत्तीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून रायगड जिल्ह्यात टेहळणी दिन ही अभिनव संकल्पना राबविण्यात आली. त्यानुषंगाने शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी १६ जुलै रोजी रायगड जिल्ह्यातील दरडप्रवण गावांमध्ये टेहळणी केली.

सध्याच्या मान्सून कालावधीमध्ये रायगड जिल्ह्याच्या दरडप्रवण भागांमध्ये नैसर्गिक आपत्तींच्या घटना घडल्यास तात्काळ मदत पोहोचविणे, स्थलांतरीत करण्यात आलेल्या निवारा केंद्रामध्ये आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करणे तसेच मागील काही दिवसांमध्ये अतिवृष्टीमुळे दरडप्रवण गावांमध्ये दरड कोसळण्याची लक्षणे आढळतात किंवा कसे याची टेहळणी करण्यासाठी तसेच तेथील नागरिकांशी संपर्क साधून अतिवृष्टीच्या वेळी सतर्क राहणे व त्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी १६ जुलै रोजी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून रायगड जिल्ह्यात टेहळणी दिन ही अभिनव संकल्पना राबविण्यात आली.



उपवनसंरक्षक रोहा, निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी– माणगाव, श्रीवर्धन, रोहा, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, तहसीलदार, निवासी नायब तहसीलदार व गटविकास अधिकारी महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत– महाड, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, उपविभागीय अभियंता, व उपअभियंता – महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, परिक्षेत्र वन अधिकारी– महाड, पोलादपूर, श्रीवर्धन म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, तालुका कृषी अधिकारी– महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, पाली, उपअभियंता, पाणीपुरवठा– महाड पोलादपूर, श्रीवर्धन म्हसळा, माणगाव, तळा, रोहा या जिल्हास्तरीय तसेच स्थानिक प्रशासनातील अधिकाऱ्यांनी महाड उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड यांच्याशी समन्वय साधला. यासाठी त्यांना रोहा उपवनसंरक्षक आप्पासाहेब निकत, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे, महाड उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश तांबे, तहसीलदार सुरेश काशिद, तहसीलदार दिप्ती देसाई, महाड नगर परिषदेचे मुख्याधिकारी महादेव रोडगे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, महसूल व पोलीस व नगर परिषद प्रशासनातील स्थानिक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

दरडप्रवण गावांमध्ये प्रत्यक्ष भेट देणे, तेथील नागरिकांशी संपर्क व संवाद साधणे, नागरिकांच्या सुरक्षिततेची तसेच अन्य गोष्टींची काळजी घेण्यासाठी जिल्हा प्रशासन सदैव त्यांच्या सोबत असल्याचा नागरिकांना विश्वास देणे, दरडप्रवण गावांच्या परिसराच्या टेहळणी दरम्यान आढळलेल्या विशेष बाबींचे निरीक्षण करून त्या बाबी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निदर्शनास आणून देणे, अशा विविध जबाबदाऱ्या या सर्व अधिकाऱ्यांना नेमून दिल्या होत्या. त्याप्रमाणे या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या वेळी मांडले, गोंडाळे (कडवेवाडी), काळभैरव नगर (नडगाव), करंजखोल, विर, मराठवाडी (विर), टोळ बुद्रुक, दासगाव (भोईवाडा), कुर्ले दंडवाडी, पातेरेवाडी (आंबिवली बुद्रुक), नातोंडी (धारेचीवाडी), करंजाडी (मस्केकोंड), मोरेवाडी (शिंगरकोंड), पांगारी (मनवेधार), रावतळी (मानेची धार), कोंडीवते (नवीन), कोंडीवते (मूळ गावठाण), चांढवे खुर्द, कोथेरी जंगमवाडी, कोथेरी (तांदळेकरवाडी), कोथेरी (मूळ गावठाण), मुठवली, सव, चोचिंदे, चोचिंदे कोंड, गोठे बुद्रुक, कोसबी, सापे वामणे, सोनघर, जुई बुद्रुक, लोअर तुडील (नामावले कोंड), कुंथळे, रोहन, वलंग, आदिस्ते, खैरे तर्फे तुडील, ओवळे, वराठी (बौद्धवाडी), चिंभावे (बौद्धवाडी), पिंपळकोंड, आंब्याचा कोंड, मुमुर्शी गावठाण, मुमुर्शी (बौद्धवाडी), तळोशी, खर्डी, हिरकणीवाडी, परडीवाडी (गोठण), सांदोशी, हेटकर कोंड (सांदोशी), पाचाडवाडी, पुनाडेवाडी, नानेमाची / नानावाडी / वाकी बुद्रुक, आड्राई, वाघेरी (आदिवासीवाडी), वाळण बुद्रुक, झोळीचा कोंड, केतकीचा कोंड, वेरखोले (बिरवाडी), शेलटोली, पिंपळवाडी–शेडगेवाडी, दुधाणेवाडी, जोगळेवाडी, रुपवली–बौद्धवाडी, सुंभेकोंड, निगडे खोतवाडी, मोहोत (सुतारवाडी व भिसेवाडी), खरवली (बौद्धवाडी), भिवघर, आंबेनळी (आंबेशिवथर), बारसगाव, तळीये, माझेरी, पारमाचीवाडी, वरंध (पोकळेवाडी– कुंभारकोंड), वरंध (बौद्धवाडी), माटवण, हावरे, कालवली भोसलेवाडी, लोहारे, पाले, सडवली, धामणदिवी, चरई, बोरावळे कोंडवेकोंड, मोरसडे आडाचाकोंड, मोरसडे बालमाची, मोरसडे सडेकोंड, मोरसडे दिवाळवाडी, कुडपण बुद्रुक, कुडपण खुर्द, परसुले, चांदके, खोपड, ढवळे आदिवासीवाडी, नानेघोळ कडूवाडी व कदमवाडी, नानेघोळ गावठाण, नानेघोळ बाबरवाडी, साखर चव्हाणवाडी, साखर सुतारवाडी, साखर पेठेवाडी, गोवेले गावठाण, केवनाळे आंबेमाची, रानकडसरी चिरेखिंड, वाकण मुरावाडी, किनेश्वर, किनेश्वर पेठेवाडी, किनेश्वर शिववाडी, भोगाव येलंगेवाडी, कातळी कामतवाडी, कोंढवी, कापडे खुर्द, रयतळवाडी, कापडे कुंभळवणे, कापडे खुर्द, कोसमवाडी, कामथे, कामथे फौजदारवाडी, चिखली, वदघर सोनारवाडी, तुटवली, ओंबळी, कोतवाल खुर्द, लहुळसे, रानकडसरी, दाभोळ, महाळुंगे, वाकण धामणीचीवाडी, चांभारगणी खूर्द, हळदुळे, केवनाळे, चांदले, खांडज, नावाळे, बोरघर महादेवाचा मुरा, आडावळे बुद्रुक, तुर्भेकोंड या दरडप्रवण गावांना भेट दिली.

या अधिकाऱ्यांनी तेथील ग्रामस्थांशी संवाद साधला. त्यांना दरडीची पूर्व लक्षणे, घ्यावयाची काळजी याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन करून अतिवृष्टीच्या काळात सर्वांनी सतर्क राहण्याचे आवाहन केले. त्यांना जिल्हा प्रशासनाने जिल्हा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापनासाठी केलेल्या तयारीची, उपलब्ध साहित्य सामुग्रीविषयीची माहिती दिली. तसेच त्यांच्याशी चर्चा करीत, त्यांच्या समस्या जाणून घेत त्यावर उपाययोजना करण्याबाबतची कार्यवाहीदेखील तात्काळ सुरु केली.

या टेहळणी दिनानिमित्त निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे यांनी पोलादपूर तालुक्यातील कुडपण, भोगाव (येलंगेवाडी) आणि कोंढवी या दरडप्रवण गावांना भेट देऊन पाहणी केली. तसेच त्यांनी तळीये येथे भेट देऊन दरडग्रस्त गावाचे पुनर्वसन होत असलेल्या कामाची पाहणी करून तेथील ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या.

जिल्हा व स्थानिक प्रशासनातील प्रत्येक अधिकारी व कर्मचारी नागरिकांची सुरक्षितता व त्याबाबत करावयाच्या उपाययोजनांबाबत सदैव दक्ष आहेत, ग्रामस्थांनी अतिवृष्टीच्या काळात स्वत:ची काळजी घ्यावी, प्रशासन देत असलेल्या सूचनांचे पालन करावे व कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी स्थानिक प्रशासनाशी तात्काळ साधावा, असे आवाहन या वेळी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्यावतीने टेहळणी केलेल्या अधिकाऱ्यांनी येथील ग्रामस्थांना केले.

# दिव्यांगांच्या मागण्या मान्य



## रोहा नगर परिषद प्रशासनाचे आश्वासन; सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानच्या पाठपुराव्याला यश

**धाटाव : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील दिव्यांग बांधवांच्या अनेक मागण्या प्रलंबित होत्या. त्यांचा सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानने पाठपुरावा केल्यानंतर रोहा नगरपालिका प्रशासनाने दिव्यांग बांधवांचे प्रलबित प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले आहे.

दिव्यांगांच्या हक्काचा पाच टक्के निधी वाटप, थेट पेन्शन, नव्याने सर्व्हे करणे यासह रोहा नगरपालिका हद्दीतील दिव्यांग बांधवांचे अनेक प्रश्न प्रलंबित होते. दरम्यान, सुराज्य प्रतिष्ठानने गेल्या पाच वर्षांतील पाच टक्के निधी वाटपची लाभार्थ्यांसह माहिती गोळा केली. प्रत्येक वर्षी लाभार्थ्यांच्या संख्येत तफावत असल्याचे वारंवार नगरपालिका प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. गेल्या सात महिन्यांपासून प्रतिष्ठान तर्फे या विषयाचा पाठपुरावा सुरू होता.

सुराज्य प्रतिष्ठानच्या शिष्टमंडळाने सोमवारी (दि. १८) रोहा नगरपालिकेचे मुख्याधिकारी धीरज चव्हाण यांची भेट घेतली. या वेळी रोहा नगरपालिका हद्दीतील दिव्यांग बाधवांचे सर्वेक्षण करण्यात यावे, अंथरुणावर खिळलेल्या दिव्यांग बाधवांची यादी जाहीर करावी, दरवर्षी दिव्यांग बाधवांना अर्ज न भरता सरसकट पेन्शन द्यावी, दिव्यांग बांधवांचे पैसे थेट त्यांच्या अकाउंटमध्ये जमा करावेत या सह अनेक मागण्या प्रतिष्ठनच्या शिष्टमंडळाने केल्या. या वेळी झालेल्या चर्चेमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले दिव्यांग बाधवांचे प्रश्न सोडविण्याचे आश्वासन मुख्याधिकारी चव्हाण यांनी दिले. सुराज्य प्रतिष्ठानचे रोहा शहर अध्यक्ष वेदांत देशमुख, खजिनदार किरण कानडे, वैभव कुलकर्णी, रिया कासार आदि या वेळी उपस्थित होते.

# शिवीगाळ, ठार मारण्याची धमकी

## आरोपींवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

अश्लील शिवीगाळी व ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात दोघा आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माणगाव तालुक्यातील रा.होडगाव कोंड येथील रोहिणी उदय नांदे (वय ३७) या सचिन चंद्रकांत गोळे (वय ४५) आणि स्वाती राकेश कळमकर (वय३०) यांच्यासह गुरुवारी (दि.२१) सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास मुंबई–गोवा महामार्गावरून चालत कोर्टाकडे जात होत्या. त्या काळनदीजवळील मच्छी मार्केट परिसरात आल्या असता महेंद्र शंकर मोरे आणि सुरेश नथुराम शिगवण (दोघे रा. होडगाव कोंड, ता. माणगाव) यांनी रोहिणी नांदे यांचा हात पकडून अश्लील शिवीगाळ करून ठार मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी रोहिणी नांदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून माणगाव पोलीस ठाण्यात आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अस्मिता पाटील करीत आहेत.

# मिनीट्रेनचे डब्बे चालले दुरुस्तीसाठी

**कर्जत : बातमीदार**

पर्यटकांची लाडकी नेरळ– माथेरान मिनीट्रेन अद्याप नॅरोगेजवर आलेली नाही. मात्र या मार्गावर अमनलॉज ते माथेरान स्टेशन या दरम्यान मिनीट्रेनची शटल सेवा चालविली जात आहे. त्यामुळे पर्यटकांना मिनीट्रेनचा आनंददेखील घेता येत असतो. मात्र त्याच मिनीट्रेनचे प्रवासी डब्बे आणखी आकर्षक आणि मजबूत असावेत यासाठी त्यांची दरवर्षी सर्व्हिसिंग केली जाते आणि या कामासाठी हे मिनीट्रेनचे डब्बे नेरळ लोको येथून कुर्डुवाडी येथील कारशेडमध्ये पाठवले जात आहेत.

नेरळ–माथेरान मिनीट्रेन न थकता ११५वर्षे पर्यटक प्रवासी यांच्या सेवेत आहे. त्या मिनीट्रेनच्या नेरळ– माथेरान मार्गावर दुरुस्तीची कामे सुरु असून त्यासाठी नेरळ–माथेरान मार्गावर मिनीट्रेनची प्रवासी सेवा चालविली जात नाही. मात्र माथेरान स्टेशन ते अमन लॉज या दरम्यान मिनीट्रेनची शटल सेवा चालविली जाते. या मिनीट्रेनच्या डब्यांची दुरुस्ती मध्य रेल्वेकडून दरवर्षी पावसाळ्यात केली जाते. या डब्यांच्या दुरुस्तीची कामे नेरळ येथे केली जात नाही. त्यामुळे मिनीट्रेनचे डब्बे नेरळ येथून पुणे विभागातील कुर्डुवाडी येथील मध्य रेल्वेच्या कार्यशाळेत नेले जातात. तेथे प्रवासी डब्यांची रंगरंगोटी तसेच चित्रे चिटकवणे, दुरुस्तीची कामे केली जातात. त्यासाठी सध्या नेरळ लोकोमधून मिनीट्रेनचे प्रवासी डब्बे कुर्डुवाडी तेथे नेले जात असून, ऑक्टोबरमध्ये हे सर्व डब्बे नव्याने सुरु होणाऱ्या पर्यटन हंगामासाठी सज्ज होऊन येणार आहेत.



# कुशिवली येथे वृक्षारोपण



**कर्जत : बातमीदार**

राज्य प्राथमिक शिक्षक समिती या संघटनेच्या हीरक महोत्सवानिमित्त कर्जत तालुका युनिटतर्फे शुक्रवारी (दि. २२) कुशिवली प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप आणि शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या कर्जत शाखेच्या वतीने शुक्रवारी कुशिवली शाळेत संघटनेचा हिरक महोत्सव साजरा करण्यात आला. संघटनेचे तालुका अध्यक्ष समीर येरूणकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले. संघटनेचे राज्य प्रतिनिधी परशुराम म्हात्रे व जिल्हा समन्वयक राजेश जाधव यांची यथोचित भाषणे झाली. या वेळी कुशिवली शाळेच्या शिक्षकांकडून गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत वाटप करण्यात आली. संघटनेच्या वतीने शाळा परिसरात ६०वृक्षांची लागवड करण्यात आली.

संघटनेचे कर्जत तालुका उपाध्यक्ष श्रीकृष्ण सुपे यांनी सूत्रसंचालन केले. संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष किशोर पाटील, कर्जतच्या केंद्रप्रमुख अरुणा गंगावणे, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर बुरुड, माजी कार्याध्यक्ष अनंत खैरे, सचिव मारुती एंदे, महिला संपर्क प्रमुख कांचन पाटील, केंद्र समन्वयक दीपक तुरे, ज्ञानेश्वर वाडीले, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संतोष विचारे या वेळी उपस्थित होते. मारुती एंदे यांनी आभार मानले.

### राष्ट्रीय वरिष्ठ पुरुष गट कबड्डी स्पर्धा

# महाराष्ट्राची धडाकेबाज विजयी सलामी

**चरखी दादरी (हरियाणा) : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रसह गटविजेते भारतीय रेल्वे, सेनादल यांची ६९व्या राष्ट्रीय वरिष्ठ पुरुष गट कबड्डी स्पर्धेत विजयी सलामी दिली. हरियाणा चरखी दादरी येथे खेळल्या गेलेल्या या स्पर्धेतील ड गटात महाराष्ट्राने दुबळ्या त्रिपुराचा ६९-२० असा पराभव करीत पहिल्या साखळी विजयाची नोंद केली.



महाराष्ट्राने मध्यांतरापर्यंत दोन लोण देऊन आघाडी घेत आपला इरादा स्पष्ट केला. मध्यांतरानंतर आणखी तीन लोण देत गुणांचे अर्धशतक पार केले आणि ४९ गुणांच्या फरकाने मोठा विजय साकारला. महाराष्ट्राने या सामन्यात एकूण प्रतिस्पर्ध्यावर पाच लोण दिले. अस्लम इनामदार, सिद्धेश पिंगळे, शंकर गदई यांच्या झंजावाती चढाया आणि त्याला किरण मगर यांनी डाव्या कोपऱ्यातून उत्कृष्ट चवडे काढत केलेल्या पकडी व मधरक्षक अक्षर भोईरची साथ यामुळे हा मोठा विजय मिळविता आला.

गतविजेत्या रेल्वेने अ गटात ओडिशाचा ५१-१९ असा, ब गटात सेनादलाने आसामला ५५-१७ असे, क गटात राजस्थानने विदर्भाला ६०-३१ असे, तर फ गटात यजमान हरियाणाने बीएसएनएलचा ५८-०५ असा पराभव करीत पहिल्या साखळी विजयाची नोंद केली.

या स्पर्धेत भारतीय रेल्वे, सेनादल, बीएसएनएलच्या बरोबरीने २८ राज्याच्या संघांनी सहभाग घेतला आहे. त्यांची आठ गटांत विभागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र वरिष्ठ पुरुष संघाचा ड गटात समावेश असून त्रिपुरासह केरळ व तामिळनाडू हे अन्य संघ या गटात आहेत. महाराष्ट्राला साखळी गट तसा सोपा वाटतो. उपउपांत्य फेरीपर्यंत तो मजल मारेल, असे सध्याचे चित्र पाहता वाटते, पण हा संघ अगदीच नवखा आहे.


## नीरज चोप्रा वर्ल्ड ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीसाठी पात्र

**युजीन (अमेरिका) : वृत्तसंस्था**

ऑलिम्पिक पदक विजेता भारतीय भालाफेकपटू नीरज चोप्राने जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे. नीरजने पहिल्याच प्रयत्नात ८८.३९ मीटर अंतरावर भाला फेकत अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले. युजीनमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेची अंतिम फेरी रविवारी (दि. २४) होणार आहे.

पात्रता फेरीसाठी २४ वर्षीय नीरज चोप्रा 'अ' गटामध्ये होता. जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेची अंतिम फेरीत पात्र होण्यासाठी ८३.५० मीटर अंतर पार करण्याची आवश्यकता असते. 'अ' गटात नीरजची कामगिरी सर्वोत्तम ठरली. या गटातून टोकियो ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता चेक प्रजासत्ताकचा जॅकूब व्हॅडलेच यानेदेखील अंतिम फेरी गाठली.

नुकतेच नीरजने प्रतिष्ठेच्या डायमंड लीग ॲथलेटिक्समध्ये रौप्यपदक जिंकत नवा राष्ट्रीय विक्रम केला. त्याने ८९.९४



मीटर अंतर भाला फेकला. ऑगस्ट २०१८मध्ये झुरिच येथे झालेल्या डायमंड लीगमध्ये नीरजने चौथे स्थान मिळवले होते. त्या वेळी त्याने ८५.७३ मीटर अंतरावर भाला फेकला होता.


### अन्नू राणीही अंतिम फेरीत

पुरुष भालाफेकीत अजून एका भारतीय खेळाडूने चमकदार कामगिरी केली आहे. नीरज चोप्रापाठोपाठ रोहित यादवनेदेखील भालाफेकीची अंतिम फेरी गाठली आहे. रोहित ८०.४२ मीटर भाला फेकत अंतिम फेरीसाठी पात्र होणाऱ्यांच्या १२ जणांच्या यादीत ११व्या स्थानावर राहिला. याआधी भारताची भालाफेकपटू अन्नू राणीनेही जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे. त्यामुळे भारताला पदकांची आशा आहे.

### ट्रिपल जम्पमध्ये पॉल फायनलमध्ये

ट्रिपल जम्पमध्ये भारताच्या एल्डहोस पॉलने अंतिम फेरी गाठली आहे. वर्ल्ड ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये ट्रिपल जम्प प्रकारात अंतिम फेरी गाठणारा पॉल हा पहिला भारतीय खेळाडू ठरला. त्याने पात्रता फेरीत ग्रुप 'अ'मध्ये १६.६८ मीटर जम्प करीत सहावे स्थान पटकावले, तर तो अंतिम फेरी गाठणाऱ्या १२ जणांच्या यादीत १२व्या स्थानावर राहिला. ट्रिपल जम्पची फायनल रविवारी (दि. २४) सकाळी ६.५० वाजता होणार आहे. यंदाच्या वर्ल्ड ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताचे सहा ॲथलिट वेगवेगळ्या क्रीडा प्रकारात अंतिम फेरीत पोहचले आहेत.

## के. एल. राहुल कोरोनाबाधित



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा सलामीवीर के. एल. राहुलच्या कोरोना चाचणीचा अहवाल सकारात्मक आला आहे. त्यामुळे २९ जुलैपासून सुरू होणाऱ्या वेस्ट इंडिजविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेसाठी त्याच्या उपलब्धतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) कार्यकारी परिषदेच्या बैठकीनंतर मंडळाचा अध्यक्ष सौरव गांगुलीने राहुलबाबतची माहिती दिली. राहुलवर नुकतीच जर्मनी येथे शस्त्रक्रिया झाली होती. त्यामुळे विंडीजविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी त्याचा विचार झाला नाही. त्यानंतरच्या पाच सामन्यांच्या ट्वेन्टी-२० मालिकेसाठी त्याचा संघात समावेश करण्यात आला आहे, मात्र आता कोरोनामुळे तो या मालिकेत खेळण्याबाबत साशंकता आहे.

## आशिया चषक क्रिकेट स्पर्धा होणार यूएईमध्ये

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आगामी आशिया चषक क्रिकेट स्पर्धा आता श्रीलंकेऐवजी संयुक्त अरब अमिराती (यूएई) येथे होणार आहे. तशी माहिती भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे बीसीसीआयचे प्रमुख सौरव गांगुली यांनी दिली. सध्या या काळात यूएईमध्ये पाऊस नसतो. त्यामुळे यूएई हेच आशिया चषक स्पर्धेसाठी योग्य असेल, असे गांगुलीने म्हटले आहे.

याआधी ही स्पर्धा श्रीलंका येथे खेळवली जाणार होती, मात्र या देशावर राजकीय तसेच आर्थिक संकट ओढावले आहे. त्यामुळे येथील नागरिक प्रचंड संतापलेले आहेत. परिणामी आशिया चषक क्रिकेट स्पर्धा



श्रीलंकेत खेळवणे योग्य होणार नाही, असा बीसीसीआयचा विचार आहे. याच कारणामुळे ही स्पर्धा आता श्रीलंकेऐवजी यूएई येथे खेळवली जाणार आहे.

वेळापत्रकानुसार ही स्पर्धा २६ ऑगस्ट ते ११ सप्टेंबर या कालावधीत होणार आहे. मुख्य स्पर्धेपूर्वी एक पात्रता फेरी होईल, ज्यामध्ये हाँगकाँग, सिंगापूर, कुवेत आणि यूएईचे संघ पात्रता एकमेकांना आव्हान देतील. अफगाणिस्तान, पाकिस्तान, भारत, श्रीलंका आणि बांगलादेश हे पाच पूर्ण सदस्य संघ थेट प्रवेशासाठी पात्र आहेत.

### प्रो कबड्डी लीगच्या नवव्या हंगामाला लवकरच सुरुवात

**मुंबई : प्रतिनिधी**

विवो प्रो कबड्डी लीगच्या नवव्या हंगामाला लवकरच सुरुवात होणार आहे. या लीगसाठी मुंबईत खेळाडूंच्या लिलाव प्रक्रियेचे आयोजन करण्यात येणार आहे. लक्षणीय बाब म्हणजे या वर्षी तब्बल ५००हून अधिक खेळाडू लिलावात सहभागी होणार आहेत.

नवव्या हंगामासाठी खेळाडूंचा लिलाव ५ व ६ ऑगस्टदरम्यान मुंबईत होईल. या लिलावात विदेशी खेळाडूंसह भारतातील युवा खेळाडूंना चार श्रेणींमध्ये विभागले जाईल. अ, ब, क, ड या श्रेणींमध्ये अष्टपैलू, बचावपटू आणि चढाईपटू यानुसार खेळाडूंना विभागले जाणार आहे.

## नेरूळ जिमखान्यात अत्याधुनिक स्विमिंग पूल

**उद्या भूमिपूजन**

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील नेरूळ जिमखानामध्ये ऑलिम्पिकच्या धर्तीवर ५० मीटर लांबीचा अत्याधुनिक जलतरण तलाव बांधण्यात येणार असून त्याचे भूमिपूजन रविवारी (दि. २४) गायक आणि संगीतकार शंकर महादेवन यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय मुखर्जी, १९८३च्या क्रिकेट वर्ल्डकप विजेत्या टीममधील खेळाडू बलविंदरसिंग संधू तसेच छत्रपती पुरस्कार विजेते जलतरणपटू उपस्थित राहणार आहेत.

जलतरण खेळाचा विकास आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने याच दिवशी १० आणि १२ वर्षाखालील मुला-मुलींसाठी सकाळी ८ वाजल्यापासून जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. नेरूळ जिमखाना येथे असलेल्या १६ मीटर लांबीच्या जलतरण तलावात एकूण ३२ प्रकारच्या गटांमध्ये ही स्पर्धा होणार आहे, असे जिमखानाचे मानद सचिव विकास शेट्टी यांनी सांगितले.

## दुलीप, इराणी स्पर्धांसाठी बीसीसीआय प्रयत्नशील

**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी देशांतर्गत क्रिकेट हंगामात दुलीप करंडक आणि इराणी चषक या प्रतिष्ठेच्या स्पर्धा पुन्हा सुरू करण्यासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) प्रयत्नशील आहे. रणजी करंडक स्पर्धाही पूर्ण स्वरूपात होण्याची दाट शक्यता आहे.

दुलीप करंडक आणि इराणी चषक या स्पर्धांना भारतातील देशांतर्गत क्रिकेटमध्ये महत्त्वाचे स्थान आहे, मात्र गेल्या तीन हंगामांमध्ये या स्पर्धा खेळवण्यात आल्या नव्हत्या तसेच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर २०२०मध्ये रणजी करंडक स्पर्धा रद्द करणे बीसीसीआयला




भाग पडले होते. गेल्या हंगामात रणजी स्पर्धा मर्यादित स्वरूपात झाली होती. जैवसुरक्षा वातावरणात झालेल्या या स्पर्धेत सामन्यांची संख्या कमी करण्यात आली होती.

मुंबईत झालेल्या बीसीसीआयच्या कार्यकारी परिषदेच्या बैठकीत विविध पर्यायांवर चर्चा झाली. अखेरीस २०२२-२३च्या देशांतर्गत क्रिकेट हंगामात नियमितपणे स्पर्धा होणार असल्याचे बीसीसीआय अध्यक्ष सौरव गांगुलीने सांगितले.

दुलीप करंडक स्पर्धा ही पूर्वी पाच विभागांमध्ये (उदा. पश्चिम, दक्षिण) बाद फेरीच्या स्वरूपात खेळविण्यात येत होती, मात्र पुढे त्यात बदल करून ही स्पर्धा तीन संघांमध्ये खेळवली जाऊ लागली. प्रत्येक संघ एकमेकांशी खेळल्यानंतर अव्वल दोन संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरायचे. आगामी हंगामात ही स्पर्धा ८ सप्टेंबरपासून घेण्याचा बीसीसीआयचा विचार आहे.

इराणी चषकासाठीचा सामना १ ते ५ ऑक्टोबर या कालावधीत होण्याची शक्यता आहे. या सामन्यात रणजी विजेत्या संघाला शेष भारत संघाशी दोन हात करावे लागतात.

मुश्ताक अली ट्वेन्टी-२० स्पर्धेला ११ ऑक्टोबर, विजय हजारे करंडक एकदिवसीय स्पर्धेला १२ नोव्हेंबरपासून सुरुवात होणे अपेक्षित आहे, तर रणजी करंडक स्पर्धेला १३ डिसेंबरपासून प्रारंभ होण्याची शक्यता असून बाद फेरीचे सामने १ फेब्रुवारीपासून खेळवले जाऊ शकतील.

### तैपेई खुली बॅडमिंटन स्पर्धा

## क्रॅस्टो, कश्यपची आगेकूच

**तैपेई : वृत्तसंस्था**

भारताची प्रतिभावान बॅडमिंटनपटू तनीषा क्रॅस्टोने तैपेई खुल्या स्पर्धेतील दमदार कामगिरी सुरू राखताना महिला आणि मिश्र दुहेरी गटाची उपांत्यपूर्व फेरी गाठली तसेच माजी राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेत्या पारूपल्ली कश्यपलाही आगेकूच करण्यात यश आले.

१९ वर्षीय तनीषाने इशान भटनागरच्या साथीने खेळताना मिश्र दुहेरी गटाच्या उपउपांत्यपूर्व फेरीत चायनिज तैपेईच्या चेंग काय वेन आणि वांग यु क्रिओ जोडीवर २१-१४, २१-१७ अशी सरशी साधली. मग महिला दुहेरीत तनीषाने श्रुती मिश्राच्या साथीने तैपेईच्याच जिया यिन लिन आणि लिन यु-हाओ जोडीचा २१-१४, २१-८ असा पराभव केला.

दुसरीकडे अनुभवी कश्यपने पुरुष एकेरीच्या सामन्यात तैपेईच्या चिआ हाओ ली याच्यावर २१-१०, २१-१९ अशी मात केली. मिथुन





मंजुनाथन आणि किरण जॉर्ज यांचे आव्हान मात्र संपुष्टात आले. मिथुनला चौथ्या मानांकित जपानच्या कोडाय नाराओकाने २४-२२, ५-२१, १७-२१ असे, तर किरणला चोउ टिन चेन याने २१-२३, २१-१६, ७-२१ असे पराभूत केले.

## श्रेयस अय्यरची जबरा फॅन

### पावसात दोन तास पाहिली तरुणीने वाट



**त्रिनिदाद : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ व्यवस्थापनाने वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी सराव सत्राचे आयोजन केले होते. जोरदार पावसामुळे भारतीय संघाला इनडोअर नेटमध्ये सराव करावा लागला. भारतीय संघाचा सराव सुरू असताना एका चाहतीने श्रेयस अय्यरची दोन तास वाट बघितल्याचे समोर आले आहे.

एकदिवसीय मालिकेतील तिन्ही सामने क्वीन्स पार्क ओव्हल मैदानावर होणार आहेत. त्यामुळे सध्या भारतीय संघ तिथे जोरदार तयारी करीत आहे. पावसामुळे संघाला मैदानावर सराव करण्याची संधी मिळाली नाही. सराव सत्राच्या वेळी जोरदार पावसाने हजेरी लावली. यावर उपाय म्हणून प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी इनडोअर नेटमध्ये संघाचा सराव घेतला. भारतीय पत्रकार विमल कुमार यांनी या सराव सत्राचा एक व्हिडीओ त्यांच्या युट्यूब चॅनेलवर शेअर केला आहे. या व्हिडीओच्या शेवटी त्यांनी एक चाहतीशी संवाद साधला आहे.


व्हिडीओत दिसणाऱ्या तरुणीचे नाव शिझारा असून ती अय्यर आणि भारतीय संघाची मोठी चाहती आहे. तिने अय्यरचा ऑटोग्राफ घेण्यासाठी दोन तास वाट बघितली. शेवटी तिला बॅटवर अय्यरचा ऑटोग्राफ मिळाला.

## 'किंग कोहली'ची मैदानाबाहेर हवा कायम

**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडियाचा माजी कर्णधार विराट कोहली सध्या खराब फॉर्ममध्ये आहे. असे तरी मैदानाबाहेर 'किंग कोहली'ची हवा अजून कायम आहे. विराट हा सोशल मीडिया सेलिब्रिटी म्हणून वर्चस्व गाजवत आहे.

**एका इन्स्टाग्राम पोस्टसाठी घेतो आठ कोटी रुपये**



इन्स्टाग्रामवरील एका पोस्टवरून सर्वाधिक कमाई करणाऱ्या आशियाई खेळाडूंमध्ये कोहली अव्वल आहे, तर जगात एकूण खेळाडूंच्या यादीत कोहली जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर आहे.

विराट कोहली बॅटने धावा करीत नसला तरी तो आशियातील सर्वाधिक कमाई करणारा सेलिब्रिटी आहे. विराट त्याच्या प्रत्येक इन्स्टाग्राम पोस्टवरून आठ कोटी रुपये कमावतो. त्याचे इन्स्टाग्रामवर २० कोटींहून अधिक फॉलोअर्स आहेत.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com